। धाराशिव । वर्ष २६ वे । अंक ८७ वा । मंगळवार दिनांक ०९ जून, २०२६ । पृष्ठे ६ । किंमत ०१ ₹    RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

(सांज दैनिक)
प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26
dainiklatursamachar@gmail.com
संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

# संभाव्य पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकाऱ्यांचा इशारा

## अनधिकृत पाणी उपशावर होणार कठोर कारवाई ; तालुकास्तरीय भरारी पथकांना साप्ताहिक अहवाल बंधनकारक

**धाराशिव (जिमाका)** – संभाव्य 'एल निनो' परिस्थितीमुळे जिल्ह्यात भविष्यात पाणीटंचाई निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेऊन प्रशासनाने खबरदारीची पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. सिंचन प्रकल्पांमधील उपलब्ध पाणीसाठा सुरक्षित ठेवण्यासाठी तसेच कोणत्याही प्रकारचा अनधिकृत पाणी उपसा रोखण्यासाठी जिल्ह्यात तालुकास्तरीय भरारी पथकांची स्थापना करण्यात आली असून,या पथकांनी केलेल्या कारवाईचा सविस्तर अहवाल दर सोमवारी सकाळी ११ वाजेपर्यंत जिल्हाधिकारी कार्यालयात सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांच्या अध्यक्षतेखाली १४ मे व २ जून २०२६ रोजी झालेल्या बैठकीत संभाव्य एल निनो परिस्थितीच्या अनुषंगाने पाणीटंचाई,सिंचन प्रकल्पांतील पाणीसाठा,उपयुक्त जलसाठ्याची सद्यस्थिती तसेच चारा टंचाईसारख्या विषयांचा आढावा घेण्यात आला.या बैठकीत दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाल्यास त्यावर प्रभावी नियंत्रण ठेवण्यासाठी विविध उपाययोजनांवर चर्चा करण्यात आली.

बैठकीत पर्जन्यमान कमी राहिल्यास आगामी काळात पाणीटंचाईची परिस्थिती उद्भवू शकते,अशी शक्यता व्यक्त करण्यात आली. त्यामुळे पाटबंधारे विभागाच्या अखत्यारीतील सिंचन प्रकल्पांमधील उपलब्ध पाणीसाठा जतन करणे अत्यंत आवश्यक असल्याचे स्पष्ट करण्यात आले.कोणत्याही प्रकल्पातून अनधिकृत पाणी उपसा होणार नाही यासाठी तालुकास्तरीय भरारी पथके नियुक्त करण्यात आली आहेत.

या पथकांमध्ये प्रामुख्याने नायब तहसीलदार,संबंधित महसूल मंडळ अधिकारी,संबंधित क्षेत्रातील तलाठी, पाटबंधारे विभागाचे शाखा अभियंता, महावितरण कंपनीचे संबंधित अभियंता तसेच कार्यक्षेत्रातील पोलिस उपनिरीक्षक यांचा समावेश करण्यात आला आहे. सिंचन प्रकल्पांतील पिण्याच्या पाण्यासह इतर कोणत्याही प्रयोजनासाठी अनधिकृत पाणी उपसा होणार नाही,याची दक्षता घेण्याच्या सूचना या पथकांना देण्यात आल्या आहेत.

प्रशासनाने सर्व प्रकल्पांवर भरारी पथकांमार्फत नियमित भेटी देण्याचे आदेश दिले असून,अवैध पाणी उपसा आढळल्यास तात्काळ कारवाई करण्याचे निर्देशही दिले आहेत.नागरिकांकडून तोंडी अथवा लेखी तक्रार,निवेदन,माहिती किंवा अर्ज प्राप्त झाल्यास त्यानुसार संबंधित प्रकरणाची चौकशी करून आवश्यक ती कार्यवाही करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

अनधिकृत पाणी उपशाच्या प्रकरणांमध्ये पाटबंधारे अधिनियम १९७७ व केंद्रीय विद्युत कायदा २००३ मधील तरतुदीनुसार कारवाई करण्यात येणार आहे.यामध्ये मोटार संच जप्त करणे,दंड आकारणी, वीजपुरवठा खंडित करणे तसेच फौजदारी गुन्हे दाखल करणे यांसारख्या कठोर उपाययोजनांचा समावेश आहे.अशा कारवाईचा सविस्तर अहवाल वरिष्ठ कार्यालयाकडे सादर करण्याचेही निर्देश देण्यात आले आहेत. मात्र,जिल्हाधिकारी कार्यालयाच्या निदर्शनास आलेल्या माहितीनुसार अनेक ठिकाणी तालुकास्तरीय भरारी पथकांच्या स्थापनेचे आदेश, पथकांची रचना अथवा आजपर्यंत केलेल्या तपासणी व कारवाईचे अहवाल उपलब्ध झालेले नाहीत. ही बाब प्रशासनाने अत्यंत गंभीरपणे घेतली आहे.त्यामुळे आता प्रत्येक तालुकास्तरीय भरारी पथकाने अनधिकृत पाणी उपसा प्रकरणांवर केलेल्या कारवाईचा आवश्यक अहवाल,जीआयपी (त्रझे/त्रखझ ढससळपस) सह छायाचित्रे,पंचनामे व अन्य पूरक कागदपत्रांसह दर सोमवारी सकाळी ११ वाजेपर्यंत जिल्हाधिकारी कार्यालयात सादर करणे बंधनकारक करण्यात आले आहे. यासोबतच भविष्यात या कामकाजात कोणत्याही प्रकारची दिरंगाई,टाळाटाळ अथवा निष्काळजीपणा आढळल्यास संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांविरुद्ध नियमानुसार शिस्तभंगाची कारवाई प्रस्तावित करण्यात येईल,असा स्पष्ट इशाराही प्रशासनाने दिला आहे.

संभाव्य पाणीटंचाईच्या संकटाचा मुकाबला करण्यासाठी प्रशासनाने यंत्रणा सज्ज केली असून, जिल्ह्यातील उपलब्ध जलस्रोतांचे संरक्षण व योग्य व्यवस्थापन यावर भर देण्यात येत आहे. जिल्हाधिकाऱ्यांच्या या निर्देशांमुळे सिंचन प्रकल्पांमधील पाणीसाठा सुरक्षित राहण्यास मदत होणार असून अनधिकृत पाणी उपशाला आळा बसण्यास मदत होणार आहे.

# क्राईम न्युज

## ४,१०,००० किंमतीची वाळू पकडली

कळंब (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत आलम अजिज पठाण, रा.लाखा ता. केज जि. बीड यांनी दि. ०४.०६.२०२६ रोजी केंद्रे हॉस्पीटलचे समोर तांदुळवाडी रोड येथे सोनालिका कंपनीचा ट्रॅक्टर ट्रॉलीसह क्र एमएच २५ ए.एस.९३५७ सह १ ब्रास वाळु असा एकुण ४,१०,००० किंमतीचा माल चोरुन वाहतुक करण्यासाठी उभा असलेला मिळून आला. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-रणजित गोविंद लांडगे, पोलीस अमंलदार नेमणुक कळंब पोलीस ठाणे यांनी दि.०४.०६.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन कळंब पो ठाणे येथे भा.न्या. सं.कलम ३०३(२) सह कलम ९,१५ पर्यावरण संरक्षण अधिनियम सह कलम २१(१)(२) खाण व खनिज अधिनियम सह कलम १८१ मोवाका अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

## ट्रॅव्हल्समधून सोन्याचे दागिने व रोख रक्कम केली चोरीला

नळदुर्ग (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी धनराज शिवराज कोटे, वय ४८ वर्षे, रा. भालकी जि. बिदर राज्य कर्नाटक ह.मु. चिरोली पुणे ता. जि. पुणे यांची पत्नी ट्रॅव्हल्स गाडी क्र. एमएच २४ बी डब्लु ६००६ ही रात्री फुलवाडी टोलनाका जवळील सितारा हॉटेल येथे चहा पाणी नाष्टा करणेकरीता थांबली असता फिर्यादीचे पत्नीचे बॅगमधील १४ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने व रोख रक्कम ४,५०० असा एकुण ८३,२५० किंमतीचा माल अज्ञात व्यक्तीने चोरुन नेला. अशा मजकुराच्या फिर्यादी धनराज कोटे यांनी दि.०४.०६.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन नळदुर्ग पो ठाणे येथे ` गुन्हा नोंदवला आहे.

## ग्रामपंचायतची पाणबुडी गेली चोरीली

नळदुर्ग (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत दि.०१.०६.२०२६ रोजी काटगाव येथील ग्रामपंचायत पाणी पुरवठ्याची पाणबुडी मोटार केबल वायर असे एकुण ३२,००० किंमतीचे अज्ञात व्यक्तीने काटगाव येथील हरणी तलावातील विहरीवरुन चोरु नेली. अशा मजकुराच्या फिर्यादी परशुराम बाबुराव मुळे,व्यवसाय ग्रामपंचायत शिपाई, रा.काटगाव ता. तुळजापूर जि. धाराशिव यांनी दि.०७.०६.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन नळदुर्ग पो ठाणे येथे ` गुन्हा नोंदवला आहे.

## सोयाबीनचे ३० कट्टे अज्ञाताने चोरले

वाशी (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी सचिन ज्ञानोबा वायसे, वय रा. ब्रम्हगाव ता. वाशी जि. धाराशिव यांचे घराचे कुलूप अज्ञात व्यक्तीने तोडून आत प्रवेश करुन घरातील ३० कट्टे सोयाबीन एकुण ६०,००० किंमतीचे चोरुन नेले. फिर्यादी सचिन वायसे यांनी दिलेल्या प्रथम खबरेवरुन वाशी पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

# तुळजापूर तालुक्यात जिल्हाधिकाऱ्यांचा मुक्कामी दौरा ; तीर्थ बुद्रुक गावात विकासाचा थेट संवाद



धाराशिव (जिमाका) जिल्हा प्रशासनाचा प्रमुख गावात मुक्कामी राहून थेट गावपातळीवर लोकांशी संवाद साधत असेल,तर प्रशासन आणि नागरिक यांच्यातील दरी कमी होण्यास मोठी मदत होते, याचा प्रत्यय तुळजापूर तालुक्यातील तीर्थ बुद्रुक गावात आला.

जिल्हाधिकारी कीर्ती कुमार पुजार हे काल दि.५ जून रोजी रात्री तुळजापूर तालुक्यातील तीर्थ बुद्रुक येथे मुक्कामी दौऱ्यासाठी उपस्थित होते. या दौऱ्यात तहसीलदार,गटविकास अधिकारी तसेच तालुका प्रशासनातील विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी सहभागी झाले होते. गावात मुक्कामी थांबून जिल्हाधिकाऱ्यांनी केवळ औपचारिक पाहणी न करता ग्रामस्थांशी थेट संवाद साधत त्यांच्या अडचणी,समस्या आणि अपेक्षा जाणून घेतल्या.विशेषतः वैयक्तिक लाभाच्या शासकीय योजनांच्या अंमलबजावणीतील अडथळे,तसेच पायाभूत सुविधांशी संबंधित मुद्द्यांवर सखोल चर्चा करण्यात आली. या संवादातून गावाच्या सर्वांगीण विकासासाठी एक सुस्पष्ट विकास आराखडा तयार करण्याच्या दृष्टीने दिशा निश्चित करण्यात आली. ग्रामस्थांच्या सहभागातून गावाचा विकास आराखडा अधिक प्रभावी व वास्तवदर्शी करण्यावर भर देण्यात आला.

दौऱ्याच्या दुसऱ्या दिवशी सकाळी ७ ते सकाळी ८.३० या वेळेत जिल्हाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत गावात स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.यामध्ये अधिकारी,कर्मचारी आणि ग्रामस्थांनी एकत्र येऊन गाव परिसर स्वच्छ करण्यास हातभार लावला.त्यानंतर शिवार फेरी काढून शेतांमधील स्थितीचा आढावा घेण्यात आला.तसेच एक पेड मा के नाम या उपक्रमांतर्गत वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला.या उपक्रमामुळे गावकऱ्यांमध्ये पर्यावरणाबाबत जागरूकता निर्माण झाली. जिल्हाधिकाऱ्यांचा हा मुक्कामी दौरा केवळ प्रशासकीय पाहणीपुरता मर्यादित न राहता,प्रशासन थेट जनतेच्या दारात पोहोचल्याचा प्रत्यय देणारा ठरला. गावकऱ्यांशी झालेला थेट संवाद आणि प्रत्यक्ष सहभागातून प्रशासनाबाबतचा विश्वास अधिक दृढ झाल्याचे ग्रामस्थांनीही व्यक्त केले.

# ज्येष्ठ नागरिक आशाताई व्यंकटेश हंबीरे यांचे निधन



धाराशिव, (प्रतिनिधी)- धाराशिव येथील ज्येष्ठ नागरिक आशाताई व्यंकटेश हंबीरे (वय ८३) यांचे रविवारी (दि. ७) दुपारी अडीच वाजेच्या सुमारास वृद्धापकाळाने निधन झाले.

दैनिक संघर्षचे संस्थापक संपादक स्व. व्यंकटेश हंबीरे यांच्या पत्नी तथा दैनिक संघर्षचे विद्यमान संपादक संतोष हंबीरे, रमण हंबीरे व अभय हंबीरे यांच्या त्या मातोश्री होत. आशाताई हंबीरे या धाराशिव शहरातील जुन्या काळातील प्रसिद्ध व्यापारी पांडुरंग गोवर्धन यांच्या ज्येष्ठ कन्या होत. कुटुंबप्रमुख म्हणून त्यांनी हंबीरे कुटुंबाची जबाबदारी यशस्वीपणे सांभाळली. त्यांचा प्रेमळ, मनमिळावू व बोलका स्वभाव असल्याने त्या समाजात परिचित होत्या.

वृद्धापकाळामुळे उद्भवलेल्या आजारामुळे काही दिवसांपूर्वी त्यांना खासगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. उपचारानंतर शनिवारी त्यांना घरी सोडण्यात आले. मात्र रविवारी दुपारी त्यांची प्राणज्योत मालवली.

त्यांच्या पार्थिवावर सोमवारी (दि. ८ जून २०२६) सकाळी ११ वाजता धाराशिव येथील कपिलधार स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या पश्चात पुत्र संतोष, रमण, अभय, नातू आदित्य, यश, दीर डॉ. गोपाल हंबीरे, मुरलीधर हंबीरे, पुतणे डॉ. श्रीनिवास हंबीरे, गिरीष हंबीरे यांच्यासह मोठा परिवार आहे. त्यांच्या निधनाबद्दल विविध क्षेत्रांतून शोक व्यक्त करण्यात येत आहे. जडे परिवार लातूर समाचार यांनी दु:ख व्यक्त केले असून हंबीर परिवारास हे मोठे दु:ख सहन करण्याची परमेश्वर शक्ती देवो हीच ईश्वराकडे प्रार्थना!

# प्राचार्य ईश्वर क्षीरसागर राज्यस्तरीय आदर्श प्राचार्य पुरस्काराने सन्मानीत




धाराशिव (शीला उंबरे-पेंढरकर)- अहिल्यानगरच्या शिर्डी येथे बी. दि. चेंज फाऊंडेशनच्या वतीने राज्यस्तरीय 'पर्व चौथे' अंतर्गत आदर्श प्राचार्य आणि शिक्षक पुरस्कार वितरण समारंभ नुकताच संपन्न झाला. या समारंभात शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या शिक्षक व प्राचार्यांचा गौरव करण्यात आला. यामध्ये शाहू शिक्षण संस्थेच्या शाळेचे मुख्याध्यापक तथा प्राचार्य ईश्वर

क्षीरसागर यांना आदर्श प्राचार्य पुरस्कार जाहीर होऊन त्यांना मानपत्र, स्मृतिचिन्ह व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. यावेळी फाऊंडेशनचे पदाधिकारी, मान्यवर उपस्थित होते.

शाहू शिक्षण संस्थेच्या शाळेत प्राचार्य ईश्वर क्षीरसागर यांनी आपल्या कार्यकाळात विद्यार्थीकेंद्रित शिक्षणपद्धतीवर भर दिला. त्यांच्या नेतृत्वाखाली शाळेने शैक्षणिक निकालांसोबतच सहशालेय उपक्रम, क्रीडा, सांस्कृतिक आणि सामाजिक उपक्रमांमध्येही लक्षणीय प्रगती केली आहे.

प्राचार्य क्षीरसागर यांनी शैक्षणिक क्षेत्रातील नाविन्यपूर्ण बदल वेळोवेळी स्वीकारले, ज्यामुळे विद्यार्थ्यांच्या संकल्पना स्पष्ट होण्यास मदत झाली. यासह शिक्षकांसाठी नियमित कार्यशाळा आणि प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करून अध्यापनाची गुणवत्ता वाढवली. त्यामुळे शिक्षकवर्गात सकारात्मक वातावरण निर्माण झाले. केवळ गुणांवर भर न देता विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव देण्यासाठी विविध स्पर्धा, मार्गदर्शन शिबिरे आणि करिअर समुपदेशनाची व्यवस्था केली. शाळेला समाजाशी जोडण्यासाठी स्वच्छता अभियान, वृक्षारोपण आणि आरोग्य शिबिरांसारखे उपक्रम राबवून विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक भान जागृत केले. त्यांच्या याच सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे शाळेची शैक्षणिक प्रतिमा उंचावली आणि विद्यार्थी घडणीत मोलाची भर पडली.

पुरस्कार मिळाल्यानंतर प्राचार्य ईश्वर क्षीरसागर यांनी शाहू शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रा. लक्ष्मणराव ढोबळे आणि संचालिका ॲड. कोमलताई साळुंखे-ढोबळे यांनी कामाची संधी दिली याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. पुरस्काराचे श्रेय आपल्या संपूर्ण शिक्षकवृंद, विद्यार्थी आणि पालकांना देत यापुढेही शिक्षणाच्या माध्यमातून समाज घडवण्याचा संकल्प त्यांनी व्यक्त केला.

**पुरस्काराचे महत्त्व**

बी. दि. चेंज फाऊंडेशनचा हा राज्यस्तरीय पुरस्कार शैक्षणिक क्षेत्रातील उत्कृष्ट कामाची दखल घेण्यासाठी दिला जातो. 'पर्व चौथे' या उपक्रमाअंतर्गत राज्यभरातील गुणवंत शिक्षक आणि प्राचार्यांची निवड करून त्यांचे कार्य इतरांसाठी प्रेरणादायी ठरावे हा उद्देश आहे. ईश्वर शिरसागर यांना मिळालेला आदर्श प्राचार्य पुरस्कार हा त्यांच्या समर्पित कार्याचा आणि शाहू शिक्षण संस्थेच्या एकूण शैक्षणिक प्रगतीचा गौरव आहे.

या सन्मानामुळे शाहू शिक्षण संस्था आणि संपूर्ण शिक्षकवर्गाला नवा उत्साह मिळाला आहे.

# ब्राह्मण कल्याण ट्रस्ट आयोजित गुणगौरव सोहळा उत्साहात




धाराशिव, (प्रतिनिधी) – ब्राह्मण कल्याण ट्रस्ट, धाराशिवच्या वतीने रविवार, ७ जून रोजी येथील परिमल मंगल कार्यालयात गुणगौरव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून श्री. सिध्दीविनायक उद्योग समुहाचे अध्यक्ष दत्ता कुलकर्णी, प्रमुख पाहुणे म्हणून महाराष्ट्र साहित्य परिषदेचे माजी कार्याध्यक्ष प्रा. मिलींद जोशी, उद्योजक प्रदीप कुलकर्णी यांची उपस्थिती होती. प्रारंभी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते विद्येची देवता सरस्वतीच्या प्रतिमेचे पूजन करून दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. या सोहळ्यात १० वी, १२ वीमधील सुमारे ७० गुणवंत विद्यार्थ्यांचा उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह, गुलाबपुष्प, प्रमाणपत्र देऊन सन्मान करण्यात आला. तसेच समाजातील महिला नगरसेविका दिपाली धनंजय पाटील यांच्यासह सुनंदा मुकूंद जोशी, स्वरा धनंजय जेवळीकर, अमित अंबादास दानवे, ओकांर उमाकांत देशमुख यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

यावेळी दत्ता कुलकर्णी यांनी विद्यार्थ्यांच्या मेहनतीचे आणि यशाचे कौतुक करत त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. विद्यार्थ्यांनी असेच सातत्यपूर्ण प्रयत्न करत शिक्षण, संस्कार आणि कर्तृत्वाच्या बळावर समाजाचे व देशाचे नाव उज्ज्वल करावे अशी अपेक्षा त्यांनी यावेळी व्यक्त केली.

प्रा. मिलींद जोशी यांनी विद्यार्थ्यांसह पालकांना मार्गदर्शन करत विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक आरोग्यासह शारिरीक व बौध्दीक आरोग्याकडे लक्ष द्यावे. तसेच सध्या मोबाईलसह डिजीटल उपकरणांच्या वाढत्या वापराबद्दल चिंता व्यक्त करत एक दिवस डिजीटल उपवास करण्याची गरज असल्याचे प्रा. मिलींद जोशी म्हणाले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक राकेश कुलकर्णी, सूत्रसंचालन डॉ. स्वप्नगंधा कुलकर्णी, अपर्णा पाठक तर उपस्थितांचे आभार अंजली पाथरुडकर यांनी मानले. कार्यक्रमासाठी गुणवंत विद्यार्थी, पालक तसेच शहरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## तृणमूल काँग्रेसचे भवितव्य आंधारात

तृणमूल काँग्रेसला पश्चिम बंगालमध्ये मोठी पराभव पत्कारावा लागला, तो जिव्हारी लागणार आहे. भारतात मोठ्या प्रमाणात हिंदू समाज राहातो म्हणून याचे नाव हिदुस्थान पडले आहे. असे असताना जे बांगला देशातून भारतात घुसखोरी केलेल्यांचा लाड भारतीय नागरिक कसा खपवुन घेतील. तसे पाहिले तर ममता बॅनर्जी यांचे कार्य चांगले होते. जनमानसात त्यांची प्रतिमा चांगली होती. त्यांचे राहानीमान साधारण होते. सर्व चांगले असताना हिंदुच्या भावनेला खेळल्याचा परिणाम दिसून आला. यापुर्वी ही असे कोणी केले, त्याचा पराभव पत्कारावा लागला आहे. गोमास खाण्याचे समर्थन केले आहे. वास्तविक समाजात चांगले काम करण्यासारखे अनेक बाबी आहे. हिंदुच्या भावनेशी खेळणे योग्य नाही. असे केल्याचा ममता बॅनर्जी यांना मोठा पराभव पत्कारावा, स्विकाराला लागला आहे. मुळात ममता बॅनर्जींना भाजपाने पराभव केला असे विश्लेषन करणे योग्य नाही. जनतेनी ठरवुन पराभव केला आहे. निमित्त केवळ भाजपा आहे. पंधरा वर्षापासून कोणतीही सुधारणा वागण्यात होत नव्हती. ठराविकांचा लाड केला जात होता. घुसखोरी केलेल्याना भारतात सर्व सुखसोयी मिळवुन दिल्या जात होत्या. ते भारतीयावर स्वार होवू लागले होते. अन्याय, अत्याचार करू लागले होते. पाठबल ममता बॅनर्जी यांच्या पक्षाचे होते. एकीकडे सर्वधर्मसमभाव म्हणाचे, संविधानचे वारंवर नाव घ्यायचे, धर्मनिरपेक्ष म्हणाचे आणि याच्याच आडून हिंदुची आडवणुक किंवा हत्त्या करायाचे, याला कोणते राजकारण म्हणायाचे? त्यामुळे प.बंगालच्या मतदारांनी अद्दल घडविली आहे. आता तर त्यांचे घरचे म्हणजे जवळचे पक्षातील घरसोडून जात आहे. घराचे मालक राज्यातील राजकारणातून बेघर होत असल्याने त्या घरात राहाणे योग्य नाही असे वाटत असल्याने एक-एकजन बाहेर पडत आहे. अशा स्थितीपाहिली तर आपलेच काही खरे नाही म्हणून ममता बॅनर्जी ह्या काँग्रेस पक्षात विलिन होण्याच्या मनस्थितीत असल्याचे दिसून येत आहे. अतिषय चुकीचा मार्ग निवडला आहे. म्हणतात ना.. बुडत्याचे पाय खोलात जातात तसे ममता बॅनर्जी यांचे होताना दिसून येत आहे. अशा स्थितीत जनतेसोबत राहाणे योग्य. जनतेसाठी लढणे योग्य आहे. जनतेच्या प्रश्नाची सोडवणुक करण्याचा कार्यक्रम होती घेणे आवश्यक असताना आपली पोळी भाजून घेण्यासाठी त्यांनी बुडत्या जहाजामध्ये प्रवास करण्याचे ठरविले आहे असे दिसून येते. देशात काँग्रेसची स्थिती काय सांगते. परवाच्या पाच राज्यातील निकाल काँग्रेस स्थिती काय दर्शविते. याचा तरी विचार केला पाहिजे. काँग्रेसला आपल्या जागा वाचविण्यात यश आले नाही. तामलिनाडू मध्ये आपण होवून सत्ताधाऱ्यास मदत करावी लागली. वरचेवर काँग्रेसची स्थिती समाधानाची नाही हे माहिती असताना काँग्रेसमध्ये सामिल होणे कितपत योग्य राहणार आहे. उलट दोघांची प्रतिमा उज्वल होणार नाही. ममता बॅनजी ह्या देशपातळीवर नेत्या नाहीत. त्यांना हिंदी बोलता येत नाही. इंग्रजी भाषण एकण्यात आले नाही. केवळ प्रांतीय भाषा व ठराविकांचा लाड त्यांना भोवला आहे. देशपातळीवर काँग्रेस संपते की काय असे वाटत आहे. कारण वरचेवर यश मिळत नाही. त्याच प्रमाणात काँग्रेसला आपली प्रतिमा सुधारण्यात येत नाही. देशाचा विकास व देशातील जनतेसोबत राहाणे योग्य असताना केवळ पंतप्रधानांना शिव्या घालणे, टोचून बोलणे ही काँग्रेस पक्षाची प्रगती नाही. काँग्रेस पक्ष हा स्वातंत्र्यपुर्व काळापासूनचा आहे. आज त्याची स्थिती बिकट झाली आहे. देशभरातून शंभर खासदार निवडूण आणण्यात यश येते त्यामुळे त्याला यश म्हणायाचे का? तसे तामिळनाडूत स्थानिक पक्षाला यश मिळविता आले. द्रमुकला नाकारले त्यामुळे मतदारांची मनस्थिती कशी बनली आहे याचा विचार केला पाहिजे. राहुल व प्रियंका गांधी यांनी पक्षाची सुत्रे हातात घेतल्यावर कोणते यश संपादन केले किंवा कोणते राज्य मिळविता आले याचा विचार केला पाहिजे. देशात किती राज्य काँग्रेसकडे आहेत याचा विचार करून वाटचाल होणे अपेक्षित आहे. ममता बॅनर्जींच्या पक्षाला विलीन करून घेणे किंवा न घेणे हा काँग्रेस पक्षाची अंतर्गत बाब आहे. सध्याची स्थिती काय दर्शविते याचा विचार केला पाहिजे. काँग्रेसला आगामी काळात म्हणावे तेवढे यश मिळणार नाही. त्यापेक्षा त्या-त्या राज्यातील प्रादेशिक पक्षाला चांगले यश मिळविता येवू शकते. अशी परिस्थिती आहे. ज्या ठिकाणी आलिकडील काळात उमेदवार विजयी झाले ते पक्षामुळे नाही तर स्वकृर्त्वावर विजयी झाले व होत आहेत. महाराष्ट्रात तशी काँग्रेसची समाधानाची बाब नाही. प्रदेशाध्यक्षावर मोठी नाराजगी आहे. अनेक राज्यात खालावत चाललेली काँग्रेसची स्थिती, त्याच प्रमाणे कोणालाही न भेटू देणे हेच काँग्रेसपक्षातील वरिष्ठांना भोवत आहे. ममता बॅनर्जी ह्या जर काँग्रेस पक्षात विलीन झाल्यातर दोघांचे नुकसान अटळ आहे करण दोघांनाही मतदार जनता स्विकारेलच असे नाही. मतदार नागरिकांना आता पक्क्या पर्यायाची गरज आहे. काँग्रेसला पक्का पर्याय भाजपा मिळाला त्यामुळे आजही भाजपा सत्तेला टिकून आहे. भाजपा केंद्रस्थानी असल्यानंतर एकही राज्या बारावर्षात काँग्रेसला जिंकता आले नाही. त्यामुळे जो पर्यंत जनतेच्या मनता काँग्रेसविषयी योग्य भावना निर्माण होणार नाही तो पर्यंत अवस्था वाईटच असणार आहे. त्यात प.बंगालमध्ये मोठे अपयश स्विकारून जर काँग्रेसमध्ये विलीन होणार असतील तर दुर्दैव तृलमूलचे नव्हे तर काँग्रेसचे आहे. तसे पाहिलेतर आपची लोकप्रियता वाढत असताना अरविंद केजरीवाल बदनाम झाले. दिल्ली गेली. आता पंजाबमध्ये बदल अटळ दिसून येत आहे. केरळ मध्ये काँग्रेस आल्याने आता काही प्रमाणात अस्तित्त्व दिसून येते. बाकी काँग्रेसचे तसे काहीच दिसून येत नाही. त्यामुळे जे पडीक आहेत. आपले राज्य पंधरावर्ष राहुन टिकविता आले नाही त्यांनी दुसऱ्यापक्षात जावून तो ही खालसा करण्याचा विचार अयोग्य आहे.त्यामुळे काँग्रेसने या बाबत विचार करणे योग्य ठरणारे आहे.

# राष्ट्रीय महत्त्वाचा बाजार कायदा; सक्षम पणन सुधारणांचा नवा अध्याय

## शेतकऱ्यांच्या हितासाठी मुंबई आणि नागपूर राष्ट्रीय महत्त्वाचा बाजार अस्तित्वात



मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांच्या मार्गदर्शनात राज्यातील पणन व्यवस्थेत क्रांतिकारी परिवर्तन घडवणारा राष्ट्रीय महत्वाचा बाजार (Market of National Importance) कायदा हिवाळी अधिवेशनात संमत झाल्यानंतर आता मुंबई आणि नागपूर कृषी उत्पन्न बाजार समित्यांना 'राष्ट्रीय महत्त्वाचा बाजार' घोषित करण्यात आले आहेत. कायद्यानुसार पणन मंत्री जयकुमार रावल यांनी दोन्हीही राष्ट्रीय महत्त्वाचा बाजार अध्यक्षपदाचा पदभार स्वीकारला आहे. हा कायदा राज्यातील पणन व्यवस्था अधिक पारदर्शक, स्पर्धात्मक आणि अत्याधुनिक संसाधनांनी सुसज्ज करण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरणार आहे. यामुळे शेतकऱ्यांच्या शेतमालाला राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय पातळीवर स्पर्धात्मक दर मिळवून देण्यासाठी व्यापक बाजारपेठ उपलब्ध होणार आहे.

शेतकरी हित, बदलती अत्याधुनिक पणन व्यवस्था, वेगाने पुढे जाणारी जागतिक अर्थव्यवस्था आणि आधुनिक कृषी व्यापाराच्या गरजा लक्षात घेतल्या तर हा कायदा काळाची गरज असून सक्षम पणन सुधारणाचा नवा अध्याय आहे असे या कायद्याच्या उद्देशातून स्पष्टपणे दिसून येते.

राज्यातील कृषी उत्पन्न बाजार समित्यांचा इतिहास शंभर वर्षांहून अधिक जुना आहे. महाराष्ट्र कृषी उत्पन्न बाजार समिती कायदा १९६३ मध्ये अस्तित्वात आला. कोणताही कायदा कायमस्वरूपी अपरिवर्तनीय नसतो. बदलत्या काळानुसार, तंत्रज्ञानानुसार आणि बाजारपेठेच्या गरजेनुसार त्यामध्ये सुधारणा कराव्याच लागतात. कृषी पणन क्षेत्रातील सुधारणांचा प्रवास पारंपरिक बाजार समित्यांपासून खासगी बाजारांपर्यंत झाला आणि आता त्याच सुधारणांचा पुढील टप्पा म्हणजे जागतिक पणन व्यवस्थेच्या पार्श्वभूमीवर अत्याधुनिक पणन व्यवस्था असलेला 'राष्ट्रीय महत्त्वाचा बाजार' ही संकल्पना आहे.

या सुधारणांची बीजे २०२४-०५ पासून पेरली गेली. त्यानंतर २०१७-१८ मध्ये केंद्र सरकारने राज्यांना दिल्लीतील आझादपूर मंडीच्या धर्तीवर राष्ट्रीय स्वरूपाच्या बाजारपेठा विकसित करण्याची सूचना केली होती. विविध राज्यांतून मोठ्या प्रमाणावर कृषी मालाची आवक होणाऱ्या बाजार समित्यांसाठी स्वतंत्र रचना तयार करण्याचा मसुदाही राज्यांना पाठविण्यात आला होता.

सध्याच्या बाजार समित्यांची रचना प्रामुख्याने स्थानिक प्रतिनिधित्वावर आधारित आहे. ज्या भागातून शेतीमालाची आवक होते त्या भागातील शेतकरी प्रतिनिधी निवडणुकीतून बाजार समितीवर निवडून येतात. परंतु मुंबई, नागपूर, नाशिक किंवा पुणे यासारख्या मोठ्या बाजारांमध्ये अनेक राज्यांमधून कृषी माल विक्रीसाठी येतो. अशा परिस्थितीत केवळ स्थानिक प्रतिनिधित्व पुरेसे ठरत नाही. त्या बाजाराशी संबंधित इतर राज्यांतील शेतकरी आणि व्यापार घटकांचे व्यापक प्रतिनिधित्व गरजेचे आहे.

पणन हा राज्य सूचीतील विषय असल्यामुळे परराज्यातील शेतकरी प्रतिनिधींना निवडणुकीद्वारे बाजार समितीवर आणणे शक्य नाही. ही मर्यादा दूर करण्यासाठी राष्ट्रीय बाजार कायद्यात नामनिर्देशित संचालक मंडळाची तरतूद करण्यात आली आहे. केंद्र सरकारनेही मोठ्या बाजारांसाठी तज्ज्ञ, अधिकारी, व्यापारी, शेतकरी प्रतिनिधी आणि इतर राज्यांतील सदस्यांचा समावेश असलेले संचालक मंडळ स्थापन करण्याची शिफारस केली होती.

त्याच अनुषंगाने राष्ट्रीय बाजारांमध्ये निवडणुका न घेता पणन मंत्री अध्यक्ष, पणन राज्यमंत्री उपाध्यक्ष, तसेच वित्तीय संस्थांचे प्रतिनिधी, पणन संचालक, स्थानिक स्वराज्य संस्थांचे प्रतिनिधी, व्यापारी प्रतिनिधी, अपेडा, शेतकरी प्रतिनिधी आणि कृषी क्षेत्रातील तज्ज्ञांचा समावेश असलेले संचालक मंडळ नियुक्त केले जाणार आहे. या मंडळाच्या माध्यमातून मोठ्या बाजारांचे व्यवस्थापन अधिक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर शेतकऱ्यांच्या शेतमालाला स्पर्धात्मक दर मिळवून देण्यासाठी परिणामकारक आणि राष्ट्रीय स्तरावरील गरजांशी सुसंगत होईल.

राष्ट्रीय बाजार म्हणून निवड होण्यासाठीही विशिष्ट निकष ठेवण्यात आले आहेत. किमान ८० हजार टन कृषी मालाची वार्षिक आवक असणे आणि किमान दोन राज्यांमधून कृषी माल विक्रीसाठी येणे आवश्यक राहणार आहे. त्यामुळे आशिया खंडातील सर्वात महत्त्वपूर्ण कृषी उत्पन्न बाजार समिती समजल्या जाणाऱ्या मुंबई व विदर्भातील अत्यंत महत्त्वपूर्ण असलेली कृषी उत्पन्न बाजार समिती नागपूर यांसारख्या मोठ्या बाजार समित्यांचे राष्ट्रीय महत्त्वाच्या बाजारात रूपांतर करण्यात आले आहे. यामुळे शेतकऱ्यांचे व्यापक हित जोपासले जाणार आहे.

आज बाजार समित्यांना शंभर वर्षांहून अधिक काळ झाला असला तरी त्यांतील व्यवहारांची वाढ अपेक्षित प्रमाणात झालेली दिसत नाही. शेतमालाचे दर, सुविधा, पायाभूत व्यवस्था, अतिक्रमण, पारदर्शकता याबाबत अनेक तक्रारी सातत्याने होत असतात. अनेकदा निवडून आलेल्या संचालक मंडळांच्या अधिकारांनाही मर्यादा असतात. आता राष्ट्रीय महत्त्वाच्या बाजाराचा दर्जा देण्यात आणि याचे अध्यक्ष थेट पणन मंत्री असल्याने बाजार समितीच्या कामकाजावर शासनाचा नियंत्रण राहणार आहे. यामुळे प्रशासनात अधिक पारदर्शकता आणि वेगवान कार्यक्षमता निर्माण होईल.

मोठ्या बाजारांमध्ये पणन मंत्री, पणन संचालक आणि तज्ज्ञ सदस्यांचा थेट सहभाग असल्यास धोरणात्मक निर्णय अधिक वेगाने घेता येतील, पायाभूत सुविधा जलद विकसित करता येतील आणि विविध राज्यांतील व्यापाऱ्यांची स्पर्धा वाढवून शेतकऱ्यांना स्पर्धात्मक दर मिळवून देता येतील.

बदलती अर्थव्यवस्था, वाढती जागतिक स्पर्धा, तंत्रज्ञानाचा वाढता वापर आणि निर्यातक्षम फळे व भाजीपाल्याचे उत्पादन या सर्व बाबी लक्षात घेता, या क्षेत्रात मूलभूत सुधारणांची गरज निर्माण झाली होती. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्य शासन सातत्याने शेतकऱ्यांना केंद्रस्थानी ठेवून राज्याची कृषी आणि विपणन व्यवस्था सक्षम करण्यासाठी हिताचे निर्णय घेत आहे. पणन मंत्री म्हणून जयकुमार रावल यांनी जबाबदारी स्वीकारल्यानंतर कालसुसंगत, शेतकरी-केंद्रित आणि स्पर्धात्मक पणन रचना उभारण्यासाठी नियोजनपूर्वक दूरगामी पावले उचलली आहेत.

या कायद्यामागील मुख्य उद्देश म्हणजे शेतमालाला राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय बाजारपेठांशी जोडणारी आधुनिक पणन व्यवस्था निर्माण करणे हा आहे. अत्याधुनिक संसाधनांनी युक्त अशा राष्ट्रीय महत्त्वाच्या बाजारपेठा उभारून त्यामार्फत शेतमाल जलद पुरवठा साखळीने महामुंबई इंटरनॅशनल अ‍ॅग्रीकल्चर मार्केटशी जोडला जाणार आहे. पॅरिस येथील रुंगीस आंतरराष्ट्रीय मार्केटच्या धर्तीवर वाढवण बंदराजवळ सुमारे १२०० एकर क्षेत्रावर जागतिक दर्जाचे बाजार केंद्र उभारण्याचा सरकारचा मानस आहे. त्यादृष्टीने शासन पावले उचलत आहे.

या इंटरनॅशनल मार्केटच्या माध्यमातून ग्रेडिंग, सॉर्टिंग, पॅकिंग, मार्केटिंग, लॉजिस्टिक सुविधा व जलद पुरवठा साखळीच्या माध्यमातून राज्यात उत्पादित फळे, भाजीपाला व इतर शेतमाल अवघ्या १२ ते १४ तासांत आंतरराष्ट्रीय बाजारात पोहोचवणे शक्य होणार असून, त्यामुळे शेतकऱ्यांना अधिक चांगले आणि स्थिर दर मिळतील.

राष्ट्रीय महत्त्वाचा बाजार ही केवळ प्रशासकीय सुधारणा नसून राज्याच्या कृषी अर्थव्यवस्थेला राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय बाजारपेठांशी जोडणारा महत्त्वाकांक्षी उपक्रम आहे. बदलत्या जागतिक स्पर्धेच्या युगात शेतकऱ्यांना अधिक बाजारपेठा, अधिक स्पर्धात्मक दर आणि आधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी अशा सुधारणांची आवश्यकता आहे. त्यामुळे या कायद्याकडे शेतकरी आणि कृषी क्षेत्राच्या दीर्घकालीन हिताच्या दृष्टीने पाहण्याची गरज आहे. महाराष्ट्राच्या कृषी पणन व्यवस्थेला नवे बळ देणारा आणि भविष्यातील बाजारपेठांसाठी सक्षम बनवणारा हा एक महत्त्वपूर्ण टप्पा ठरू शकतो.

**- बी.सी.झंवर,**
विभागीय संपर्क अधिकारी.

# हळदयुक्त आईस्क्रीम: आरोग्य आणि चव यांचा संगम

हळदयुक्त आईस्क्रीम हे पारंपरिक गोडव्याला एक आरोग्यदायी पर्याय देते. सामान्यतः आईस्क्रीम हे केवळ चवीसाठी ओळखले जाते, परंतु हळदीच्या समावेशामुळे त्याला औषधी गुणधर्मही प्राप्त होतात. हळदीमध्ये असलेले 'कर्क्यूमिन' नावाचे शक्तिशाली अँटीऑक्सिडंट आणि अँटी-इंफ्लेमेटरी गुणधर्म अनेक शारीरिक समस्यांवर प्रभावी ठरतात.

भारतीय संस्कृतीत हळदीला केवळ एक मसाला म्हणून नव्हे, तर एक औषधी वनस्पती म्हणूनही महत्वाचे स्थान आहे. पिढ्यानपिढ्या हळदीचा वापर आपल्या दैनंदिन जीवनात विविध प्रकारे केला जातो. याच परंपरेला आधुनिकतेचा स्पर्श देत, हळद आता आईस्क्रीमच्या रूपात एका नवीन चवीचा आणि आरोग्याचा संगम घेऊन आली आहे. 'हळदयुक्त आईस्क्रीम: आरोग्य आणि चव यांचा संगम' हे केवळ एक शीर्षक नसून, एका अशा अभिनव पदार्थाचे वर्णन आहे, जो जिभेला तृप्त करतो आणि शरीराला आरोग्य प्रदान करतो. हळदयुक्त आईस्क्रीम हे पारंपरिक गोडव्याला एक आरोग्यदायी पर्याय देते. सामान्यतः आईस्क्रीम हे केवळ चवीसाठी ओळखले जाते, परंतु हळदीच्या समावेशामुळे त्याला औषधी गुणधर्मही प्राप्त होतात. हळदीमध्ये असलेले 'कर्क्यूमिन' नावाचे शक्तिशाली अँटीऑक्सिडंट आणि अँटी-इंफ्लेमेटरी गुणधर्म अनेक शारीरिक समस्यांवर प्रभावी ठरतात. त्यामुळे, हळदयुक्त आईस्क्रीम केवळ एक आनंददायी डेझर्ट न राहता, आरोग्यासाठी एक उपयुक्त घटक म्हणूनही उदयास येत आहे. या आईस्क्रीमची निर्मिती प्रक्रिया देखील विशेष आहे. नैसर्गिक आणि ताजे घटकांचा वापर याला अधिक पौष्टिक बनवतात. दुध, ताजी मलई आणि नैसर्गिक साखरेसोबत जेव्हा हळदीचा योग्य प्रमाणात वापर केला जातो, तेव्हा एक विशिष्ट आणि आकर्षक रंग तसेच एक सौम्य, उष्ण आणि मधुर चव मिळते. काहीवेळा वेलची आणि केशर यांसारख्या अन्य नैसर्गिक घटकांचा वापर करून या आईस्क्रीमच्या चवीला आणखी समृद्ध केले जाते. घरी बनवताना तर आपण आपल्या आवडीनुसार आणि गरजेनुसार घटकांमध्ये बदल करू शकतो.

हळदयुक्त आईस्क्रीम कशी बनवावी ?

साहित्य: २ कप दूध,१ कप ताजी मलई,३/४ कप साखर,
१ चमचा हळद,१ चिमूट मीठ,१चिमूट वेलदोडा (ऐच्छिक),

कृती : एका पातेल्यात दूध, ताजी मलई, साखर, हळद आणि मीठ घालून उत्तमपणे मिसळा.हे मिश्रण मध्यम आचेवर ठेवा, पण ते पूर्णपणे उकळू देऊ नका. साखर पूर्णपणे विरघळे पर्यंत मिश्रणाला गरम करत रहा.

गरम करून झाल्यावर मिश्रण थंड करण्यासाठी बाजूला ठेवा.

थंड झाल्यावर मिश्रणाला एका कंटेनरमध्ये ओता आणि ३० मिनिटांनी रवी किंवा ब्लेंडरच्या साह्याने चांगले फेटा. ही प्रक्रिया ३-४ वेळा करा जेणेकरून मिश्रण एकजीव होईल आणि आईस्क्रीम हलकी आणि क्रिमी होईल.

तुम्ही आईस्क्रीमला चवीप्रमाणे वेलची वापरुन आणखीन स्वादिष्ट बनवू शकता. आईस्क्रीम तयार झाल्यावर ते सर्व्हिंग कपमध्ये ओता आणि फ्रीझ मध्ये थंड होण्यासाठी ठेवा.

हळदयुक्त आईस्क्रीमचे आरोग्यदायी फायदे :

हळदीतील कर्क्यूमिन शरीरातील सूज कमी करण्यास मदत करते, ज्यामुळे सांधेदुखी आणि इतर इंफ्लेमेटरी रोगांमध्ये आराम मिळतो.

पचनक्रिया सुधारण्यास मदत करते आणि अपचन, गॅस यांसारख्या समस्यांपासून मुक्ती देते.

रोगप्रतिकारशक्ती वाढविण्यातही हळदीचा मोठा वाटा आहे, ज्यामुळे शरीर विविध प्रकारच्या संसर्गांपासून सुरक्षित राहते.

हळदीमध्ये त्वचा निरोगी ठेवण्याचे आणि तिला नैसर्गिक चमक देण्याचे गुणधर्म देखील आहेत.

महत्व: आजच्या धावपळीच्या जीवनात, जिथे लोकांना आरोग्याची काळजी घेण्यासाठी पुरेसा वेळ मिळत नाही, अशा परिस्थितीत हळदयुक्त आईस्क्रीम एक स्वादिष्ट आणि सोपा उपाय म्हणून समोर आला आहे. लहानापासून मोठ्यांपर्यंत, सर्वांनाच आईस्क्रीम आवडते. त्यामुळे, या आवडत्या पदार्थात जर आरोग्याचे गुणधर्म मिसळले, तर ते अधिक स्वीकार्य आणि फायदेशीर ठरते. बाजारात आरोग्यदायी पदार्थांची मागणी दिवसेंदिवस वाढत आहे. आरोग्य जागरूक ग्राहक आता केवळ चवीलाच नव्हे, तर आपल्या आहारातील प्रत्येक घटकाच्या पौष्टिक मूल्याला महत्त्व देत आहेत. त्यामुळे, अनेक नवीन आईस्क्रीम ब्रँड्स आता हळदयुक्त आईस्क्रीमचे विविध प्रकार सादर करत आहेत. भारतीय मसाल्यांच्या परंपरेला आधुनिक खाद्यसंस्कृतीमध्ये यशस्वीरित्या समाविष्ट करण्याचे हे एक उत्कृष्ट उदाहरण आहे. जर तुम्हाला गोड पदार्थांची आवड असेल आणि त्याचबरोबर आपल्या आरोग्याची काळजी घ्यायची असेल, तर हळदयुक्त आईस्क्रीम नक्कीच तुमच्यासाठी एक उत्तम पर्याय ठरू शकतो.

# तुमच्या आरोग्यास निरोगी राखण्यासाठी फॉलो करा वीस बाबी

आधुनिक जीवनशैलीमुळे अनेक लोकांना आरोग्याच्या समस्यांचा सामना करावा लागत आहे. अनियमित दिनचर्या, ताणतणाव, अपूर्ण झोप आणि असंतुलित आहार यामुळे शारीरिक आणि मानसिक आरोग्यावर नकारात्मक परिणाम होतो. आरोग्य राखण्यासाठी दैनंदिन जीवनात काही साध्या पण प्रभावी उपायांची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. या ब्लॉग पोस्टमध्ये, तुमच्या दैनंदिन जीवनात आरोग्य कसे राखावे याबाबत काही महत्त्वाच्या २० दिल्या आहेत, या टिप्स चा वापर करून निरोगी आयुष्य जगण्यास सुरुवात करू शकता.

१. सकाळी लवकर उठणे

सकाळी लवकर उठण्याचे अनेक फायदे आहेत. हे तुम्हाला फ्रेश आणि ॲक्टिव्ह ठेवते. पहाटेच्या थंड आणि ताज्या हवेत चालणे किंवा व्यायाम करणे आरोग्यासाठी खूप फायदेशीर असते. सकाळी ५ च्या दरम्यान उठल्यास दिवसभर आळस कमी येतो.

२. नियमित व्यायाम करणे

रोजच्या व्यायामामुळे शरीरातील सर्व अवयव निरोगी राहतात. व्यायामामुळे ब्लड सरकुलेशन सुधारते, पचनक्रिया सुधारते आणि वजन नियंत्रित राहते. योग, धावणे, चालणे, सायकल चालवणे किंवा जिममध्ये व्यायाम करणे हे चांगले पर्याय आहेत. रोजच्या व्यायामाची एक ठराविक वेळ असावी आणि दररोज किमान ३० मिनिटे तरी व्यायाम करावा.

३. संतुलित आहार

आरोग्यासाठी संतुलित आहार घेणे महत्त्वाचे आहे. आपल्या आहारात सर्व प्रकारचे पोषक घटक असावेत. यामध्ये प्रोटीन, व्हिटॅमिन, खनिजे आणि फायबर असणे आवश्यक आहे. फळे, भाज्या, धान्य, कडधान्ये आणि दुग्धजन्य पदार्थांचा आहारात समावेश करा.

४. पुरेशी झोप

पुरेशी झोप घेतल्याने शरीर आणि मन ताजेतवाने राहते. दररोज किमान ७-८ तासांची झोप घेणे आवश्यक आहे. झोप जर पूरक झाली नाही तर मानसिक आणि शारीरिक ताण वाढू शकतो.

५. स्ट्रेस कमी करणे

स्ट्रेस आणि चिंता आरोग्यावर निगेटिव्ह परिणाम करू शकतात. स्ट्रेस कमी करण्यासाठी मेडिटेशन, योग किंवा श्वसनाचे व्यायाम करणे फायदेशीर आहे. तुम्हाला आवडणाऱ्या गोष्टींमध्ये वेळ घालवणे, पुस्तक वाचन, संगीत ऐकणे हे देखील ताण कमी करू शकतात.

६. भरपूर पाणी पिणे

दिवसभरात पुरेसे पाणी पिणे अत्यंत गरजेचे आहे. पाण्यामुळे शरीरातील विषारी पदार्थ बाहेर पडतात आणि त्वचा चमकदार राहते. दररोज किमान ८-१० ग्लास पाणी प्या. पाण्याच्या कमतरतेमुळे डिहायड्रेशन होऊ शकते, ज्यामुळे थकवा, डोकेदुखी आणि एकाग्रता कमी होण्याची शक्यता असते. पाणी पिल्याने शरीराच्या सर्व कार्यप्रणाली व्यवस्थित कार्य करतात. तुम्ही लिंबू, पुदीना किंवा फळांच्या तुकड्यांसह पाणी अधिक स्वादिष्ट करू शकता.

७. स्वच्छता पाळणे

स्वच्छता पाळणे आरोग्यासाठी खूप महत्त्वाचे आहे. नियमितपणे हात धुणे, आंघोळ करणे, दात घासणे या गोष्टींची काळजी घ्या. स्वच्छता राखल्यामुळे संसर्गजन्य रोगांपासून बचाव होतो.

८. मद्यपान करू नये

तंबाखू किंवा घुटका, या सारख्या विषारी वस्तूंचे सेवन करू नये, हे सर्व आरोग्यासाठी हानिकारक आहेत. हे अनेक गंभीर आजारांना कारणीभूत ठरू शकतात. तंबाखू आणि सिगरेट टाळल्यास कॅन्सर होण्यापासून बचाव होतो.

९. नियमित आरोग्य तपासणी

आपल्या आरोग्याची नियमित तपासणी करणे महत्त्वाचे आहे, जसे की - संपूर्ण रक्ततपासणी, मधुमेह तपासणी, कोलेस्टेरॉल तपासणी, लिव्हर फंक्शन टेस्ट (एलएफटी), किडनी फंक्शन टेस्ट (केएफटी) इत्यादी. यामुळे कोणतेही आजार लवकर ओळखता येतात आणि त्यावर योग्य वेळी उपचार घेता येतात. आपल्या डॉक्टरांच्या सल्ल्याने नियमित आरोग्य तपासणी करून घ्या.

१०. संतुलित मानसिक आरोग्य

शारीरिक आरोग्यासोबतच मानसिक आरोग्यही महत्त्वाचे आहे. आपले विचार पॉजिटीव्ह ठेवा, मेंटल स्ट्रेस टाळा आणि जीवनातील छोट्या छोट्या गोष्टींचा आनंद घ्या. आपल्याला आवडणाऱ्या गोष्टी करा आणि नेहमी हसत राहा.

११. फळे आणि भाज्यांचा आहारात समावेश

फळे आणि भाज्यांमध्ये आवश्यक व्हिटॅमिन्स आणि खनिजे भरपूर प्रमाणात असतात. त्यामुळे दररोजच्या आहारात फळे आणि भाज्यांचा समावेश करावा. यामुळे रोगप्रतिकारक शक्ती वाढते आणि शरीर तंदुरुस्त राहते. फळे आणि भाज्यांमधील फायबरमुळे पचनशक्ती सुधारते आणि वजन नियंत्रित राहते. विविध रंगांची फळे आणि भाज्या खाण्याचा प्रयत्न करा, कारण प्रत्येक रंगाचे वेगवेगळे पोषक घटक असतात. यामुळे त्वचा, केस आणि एकूणच शारीरिक आरोग्य सुधारते.

१२. अल्कोहोलचे सेवन मर्यादित ठेवा

अल्कोहोलचे सेवन मर्यादित ठेवल्याने आरोग्यावर होणारे नकारात्मक परिणाम कमी होतात. अधिक प्रमाणात अल्कोहोलचे सेवन केल्याने लिव्हर, लंग्स, हार्ट आणि इतर अवयवांवर परिणाम होऊ शकतो.

१३. गोड पदार्थांचे सेवन कमी करा

गोड पदार्थांचे अधिक सेवन केल्याने वजन वाढू शकते आणि डायबेटिस सारखे आजार होऊ शकतात. त्यामुळे गोड पदार्थांचे सेवन मर्यादित ठेवावे आणि शक्यतो नैसर्गिक गोड पदार्थांचा समावेश करावा. जसे की फळे.

१४. वजनावर नियंत्रण ठेवा

तंदुरुस्त राहण्यासाठी वजनावर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. वजन वाढल्याने अनेक आजार होऊ शकतात. संतुलित आहार, रोज व्यायाम आणि ६ -८ तास झोप यामुळे वजन नियंत्रणात राहते.

१५. धूम्रपान टाळा

धूम्रपान आरोग्यासाठी अत्यंत हानिकारक आहे. यामुळे फुफ्फुसाचे विकार, हृदयविकार आणि कर्करोग होण्याचा धोका वाढतो. त्यामुळे धूम्रपान टाळावे आणि निरोगी जीवन जगावे.

१६. नियमित अंतराने थोडेसे खाणे

दर ३-४ तासांनी थोडेसे खाणे आरोग्यासाठी चांगले असते. यामुळे पचनशक्ती सुधारते आणि ऊर्जा टिकून राहते. त्यामुळे मोठ्या प्रमाणात एकावेळी खाण्यापेक्षा नियमित अंतराने थोडेसे खाण्याची सवय लावा.

१७. ताजे अन्न खाणे

ताजे आणि घरगुती अन्न खाणे आरोग्यासाठी सर्वोत्तम आहे. बाहेरचे अन्न टाळा आणि शक्यतो ताजे आणि पौष्टिक अन्न खा. यामुळे पचनशक्ती सुधारते आणि शरीर निरोगी राहते.

१८. नियमित वेळा पाळणे

नियमित वेळी जेवण करणे, झोपणे आणि उठणे आरोग्यासाठी फायदेशीर आहे. यामुळे शरीराची जैविक घडी स्थिर राहते आणि पचनशक्ती सुधारते. त्यामुळे नियमित वेळा पाळण्याची सवय लावा.

१९. पुरेशी विश्रांती घेणे

कामाच्या दरम्यान पुरेशी विश्रांती घेणे आवश्यक आहे. यामुळे ताण कमी होतो आणि कार्यक्षमता वाढते. दर दोन तासांनी थोडावेळ विश्रांती घ्या आणि ताजेतवाने व्हा. विश्रांतीमुळे मन शांत होते आणि नवीन ऊर्जा मिळते. विश्रांतीदरम्यान काही श्वासाचे व्यायाम, मेडिटेशन किंवा स्ट्रेस कमी करण्यासाठी हलक्या खेळांचा समावेश करा. दिवसभरात काही मिनिटांचा ब्रेक घेणे आपल्या मानसिक आणि शारीरिक आरोग्यासाठी उपयुक्त ठरते. विश्रांतीमुळे एकाग्रता सुधारते आणि कामात उत्साह वाढतो.

२०. सकारात्मक विचार (ींिीींळींश ींहेींसहीं)

सकारात्मक विचार आणि दृष्टिकोन आरोग्यासाठी महत्त्वाचे आहेत. नेहमी सकारात्मक विचार करा, ताण कमी करा आणि जीवनातील प्रत्येक क्षणाचा आनंद घ्या. सकारात्मक विचारांमुळे मानसिक आरोग्य सुधारते आणि जीवनात आनंद येतो. या आरोग्य टिप्स तुम्हाला निरोगी आणि तंदुरुस्त ठेवण्यास मदत करतील. आपल्या दैनंदिन जीवनात या टिप्सचा अवलंब करा आणि निरोगी जीवन जगा.

निष्कर्ष-या आरोग्य हशरश्रींह ींळींि ळप ीरींहळ च्या तुमच्या दैनंदिन जीवनात अमलात आणल्यास तुमचे शारीरिक आणि मानसिक आरोग्य सुधारेल. निरोगी जीवन जगण्यासाठी या साध्या सवयींचा अवलंब करा आणि तुमच्या जीवनात पॉजिटीव्ह बदल घडवा. नियमित व्यायाम, संतुलित आहार, पुरेशी झोप आणि ताण कमी करण्याच्या उपायांनी तुम्ही तुमचे आरोग्य उत्तम राखू शकता. त्यामुळे या टिप्सचा अवलंब करा आणि निरोगी, तंदुरुस्त आणि आनंदी जीवन जगा.

**गेल्या वर्षी विकास दर वाढल्याचा आनंद व्यक्त करताना चालू वर्षी तो बराच घसरणार आहे, याचा उल्लेख मोदी यांनी टाळला आहे. महागाई व बेरोजगारी वाढल्यास त्यास तोंड कसे देणार या बाबत ते गप्प आहेत.**

रिझर्व बँकेने आपल्या ताज्या पत धोरणात मुख्य व्याजदर - 'रेपो दर-५.२५ टक्के असा कायम ठेवला आहे. व्यावसायिक बँकांना कर्ज देताना रिझर्व बँक जो व्याज दर आकारते त्यास 'रेपो' दर म्हणतात. त्याच वेळी सरकारने जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार मागील (२०२५-२६) आर्थिक वर्षाच्या अखेरच्या तिमाहीत (जानेवारी-मार्च) देशाचा विकास दर ७.८ टक्के राहिला. संपूर्ण वर्षाचा विकास दर ७.७ टक्के राहिला. त्याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या सरकारने केलेल्या सुधारणांचे, म्हणजेच अप्रत्यक्षपणे आपले, कौतुक केले. रिझर्व बँकेने व्याज दर कायम ठेवताना चालू (२०२६-२७) वर्षात महागाई वाढीचा दर ५.१ टक्के राहील असे म्हटले आहे. बँकेने आपल्या आधीच्या अंदाजात तब्बल अर्धा टक्का वाढ केली आहे. प्रत्यक्षात महागाई जास्त राहण्याचा धोका आहे. चालू वर्षात विकास दर ६.६ टक्के राहील असा बँकेचा अंदाज आहे. आधी बँकेने ६.९ टक्के विकास दराची अपेक्षा व्यक्त केली होती. दोन्ही मुद्द्यांचा दिलेली सवलत सरकारी कर्जरोख्यांतील गुंतवणुकीसाठी आहे. ११२.४२ लाख कोटी रुपयांचे रोखे उपलब्ध असले तरी परकीय गुंतवणूकदारांनी आतापर्यंत केवळ ३.७५ लाख कोटी रुपये गुंतवले आहेत. बँक व केंद्राच्या उपायांमुळे ४० ते ४५ अब्ज डॉलर्स येण्याची शक्यता आहे. यामुळे आयात-निर्यातीतील तूट काही अंशी कमी करणे सरकारला शक्य होईल. गेल्या वर्षी विकास दर ७.७ टक्के राहिला असला तरी जल्लोष साजरा करण्यासारखी स्थिती नाही. आधीच्या वर्षाच्या (२०२४-२५) तुलनेत कृषी क्षेत्राचा विकास दर ४.२ वरून ३ टक्के झाला आहे. खाण क्षेत्राची ११.७ वरून ५.२ टक्के अशी घसरण झाली आहे. उत्पादन, वित्त, हॉटेल व वाहतूक, दळण वळण अशा क्षेत्रांची कामगिरी चांगली झाल्याने एकूण विकास दर सावरला गेला आहे. असे असताना तो पूर्ण १.१ टक्क्याने घसरण्याची भीती रिझर्व बँकेने व्यक्त केली आहे. पश्चिम आशियातील युद्ध व अपुरा पाऊस होण्याची शक्यता बँकेने गृहीत धरली आहे. कृषी क्षेत्राचा विकास दर घसरल्यास अर्थव्यवस्थेवर त्याचा प्रतिकूल परिणाम होईल. मूडीज या पत मानांकन संस्थेने भारताचा विकास दर ६ टक्के राहाण्याचा अंदाज आधीच वर्तवला

# जाणवू लागली संकटाची चाहूल




एकत्रित विचार केल्यास ती चिंतेची बाब ठरते. रिझर्व बँकेने आपल्या पत धोरणात परकीय चलन आकर्षित करण्यासाठी काही उपाय सुच-वले आहेत. त्याच दिवशी केंद्र सरकारने परकीय संस्थात्मक गुंतवणूकदारांसाठी दीर्घकालीन व अल्पकालीन भांडवली लाभ कर रद्द केल्याची घोषणा केली.

**रुपया वाचवण्यासाठी**

परदेशातून कर्ज उभारण्यासाठी सरकारी कंपन्यांसाठी रिझर्व बँकेने काही नियम शिथिल केले आहेत. परकीय चलनात ठेवी गोळा करण्यासाठी बँकांसाठीचे नियमही सैल करण्यात आले आहेत. सरकारच्या घोषणेशी रिझर्व बँकेचे निर्णय सुसंगत आहेत. गेल्या वर्षभरात डॉलरच्या तुलनेत रुपयाची सुमारे १० टक्के घसरण झाली आहे. पश्चिम आशियात युद्ध सुरू झाल्यापासूनच्या तीन महिन्यांत त्याची किंमत सुमारे ३.५ टक्क्यांनी घसरली आहे. परकीय गुंतवणूकदारांनी चालू वर्षी मे पर्यंत सुमारे २.२५ लाख कोटी रुपये काढून घेतले आहेत. आयात-निर्यातीतील तूट सुमारे ६० अब्ज डॉलर्स राहण्याची भीती तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे. या बाबींचा रुपयावर दबाव येत असल्याने तो सावरण्यासाठी सरकार व रिझर्व बँकेने हे उपाय योजले आहेत. परकीय गुंतवणूकदारांना आहे. चालू वर्षात महागाई वाढणार हे बँकेने मान्य केले आहे. महागाई वाढीचा दर ४.६ टक्के राहील, असे बँकेने एप्रिलमध्ये म्हटले होते. चालू वर्षाच्या तिसर्या तिमाहीत हा दर ५.९ पर्यंत वाढण्याचा अंदाज आहे. २ ते ६ टक्के हा महागाईवाढीचा दर बँकेच्या दृष्टीने 'सामान्य' असला तरी सामान्य माणसासाठी तो खूप जास्त ठरू शकतो. रेपो दराबाबत बँकेने 'तटस्थ' धोरण कायम ठेवले आहे. याचा अर्थ परिस्थितीनुसार तो वाढू शकतो. विकास मंदा-वणे व महागाई वाढणे या संकटांची चाहूल रिझर्व बँकेच्या पत धोरणातून जाणवते.

# कळसूबाई : हरीश्चंद्रगड अभयारण्य



सह्याद्री पर्वत रांगेतील महाराष्ट्रामधील सर्वोच्च शिखर कळसूबाई आणि नाणेघाटाच्या सानिध्यातील हरीश्चंद्रगड यांच्या आसपासचा सुमारे ३६१.७१ चौ.कि.मी चा डोंगराळ, दुर्गम परिसर महाराष्ट्र शासनाने इ.स १९८६ मध्ये अधिघोषित केला आहे. मुळा, प्रवरा, आढळा, म्हाळुंगी या नद्यांचे खोरे आणि उत्तुंग अशी गिरी शिखरे असा हा अप्रतिम सृष्टी सौंदर्याने नटलेला परिसर असून, इ.स १९१० ते १९२४ या काळात उभारण्यात आ-लेले भंडारदरा धरण आणि या धरणामुळे निर्माण झालेला सर आर्थर लेक हा जलाशय आणि त्याच्या सभोवतालचा परिसर अनेक देशी - विदेशी पक्ष्यांना आकर्षित करतो. येथे पक्ष्यांचा अधिवास ही मोठ्या प्रमाणात पाहायला मिळतो. अहमदनगर जिल्ह्यातील अकोले तालुक्यात असलेल्या या अभयारण्याला विपुल जैवविविधता लाभली आहे.

या क्षेत्रात दक्षिण उष्ण कटीबंधीय आर्द्र मिश्र पानगळीची वने, काटेरी वने तर काही भागात सदाहरित वने अशी वनांची विविधता येथे आढळून येते. या अभयारण्यात हिरडा, जांभूळ, चांदवा, बहावा, कुंभल, कुडल, सिरस, पांगारा, कराप, आवळा, अशिंद, बेहडा, खारवेल, कळंब, सावर, सादडा, अर्जुन, धामण, अशी नानाविविध वृक्षसंपदा येथे आढळते.

या अभयारण्यात बिबळे, रानमांजरी, ताडमांजर, मुंगुस, तरस, कोल्हे, लांडगे, रानडुक्कर, भेकर, ससा, सांबर, शेकरू, घोरपड हे वन्यप्राणी देखील येथे बघायला मिळतात. विविध प्रजातीचे साप व सरडे सुद्धा येथे दिसून येतात. येथील जलाशय परिसरात करकोचे, बगळे, शराटी असे पाणपक्षी देखील येथे निदर्शनास येतात. भंडारदरा येथील महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या पर्यटन संकुलात पाटबंधारे विभागाच्या विश्रामगृहात तसेच वनविभाग व सार्वजनिक बांधकाम विभागाच्या विश्रामगृहात तसेच वनविभाग व सार्वजनिक बांधकाम विभागाच्या विश्रामगृहात पर्यटकांच्या निवासाची सोय उपलब्ध आहे. तसेच भंडारदरा धरण परिसरात खासगी रिसॉर्टस देखील आहेत.

अभयारण्याच्याच परिसरात रतनगड, मदनगड, अलंग, कुलंग, बिजनगडपट्टा, कोंबड किल्ला हे ऐतिहासिक गड-किल्ले तर रंधा फॉल, अम्ब्रेला फॉल हे मोठे धबधबे देखील येथे आहेत. कळसूबाई - हरीश्चंद्रगड अभयारण्याच्या पर्यटनासाठी ऑगस्ट ते डिसेंबर हा काळ उत्तम आहे.

संपर्क : १) वनपरिक्षेत्र अधिकारी, कळसूबाई - हरीश्चंद्रगड अभयारण्य, भंडारदरा.
२) उपवनसंरक्षक (वन्यजीव) काळे भवन, प्लॉट नं ७१५१४. एच.पी.टी कॉलेज समोर, कॉलेज रोड, नाशिक - ४२२००५. दूरध्वनी क्र : (०२५३) २३१७०८२, २३१७११४.

**कसे जाल ?**

रस्त्याने : मुंबई - नाशिक राष्ट्रीय महामार्गावर घोटी येथून भंडारदरा येथे जाण्यासाठी फाटा आहे.
मुंबई - (१८५ किमी), नाशिक - (७२ किमी)
रेल्वेने : मध्य रेल्वे मार्गातील नजीकचे रेल्वे स्थानक घोटी -( ३५ किमी. )

# बेल : शंकराच्या पुजेचे पवित्र वृक्ष



शंकराच्या पुजेतील मानाचे स्थान मिळवलेला हा वृक्ष आहे. याची पाने संयुक्त पध्दतीच्या मांडणीची असतात. याची त्रिदले असतात. देठाकडचा भाग जाड असल्याने तो तोडून शंकराला वाहिला जातो. बेलाचे झाड मध्यम उंचीचे असते. याचे महत्व पुराणात उपनिषदातही विषद केले आहेत. बेल वृक्षाच्या सालीचे काष्ठ बनवतात, हे काष्ठ विशिष्ट मंत्राने मंत्रून ताईतासारखे दंडात बांधतात.

उमामहेश्वराला प्रिय असणारा हा वृक्ष, पण गणेशचतुर्थीला गणपतीला बेलाची पानं अर्पण करायचाही प्रघात आहे. संपूर्ण बिल्ववृक्षात औषधी गुणधर्म आहेत. कमी पाण्याच्या जागी हा वृक्ष चांगला वाढतो. बेलाला काटे असतात. फांद्यावर तीन किंवा पाच दलांची संयुक्त पाने येतात. एप्रिल-मे महिन्यात बेलाला हिरवट-पांढरी, गोड वासाची फुलं येतात. बेलफळं गोल, टणक आणि हिरवट- राखट रंगाची असतात. फळाचा गर केशरी तंतुमय असून यात भरपूर बिया असतात. बियांची उगवण क्षमता कमी असते. बेलाला सरफळ, बेलपत्रं, शिवद्र त्रिदल, त्रिपत्र अशी विविध नावे आहेत. एजल मारमेलॉज असे याचे शास्त्रीय नाव आहे. बेल वात, पित्त, कफ असे तिन्हीही दोष नाहीसे करत असल्याने याला विशेष महत्त्व आहे. जुलाबात बेलफळ हे उत्तम औषध आहे. आवेमुळे पोट दुखत असेल तर बेलफळाचा मुरंबा खातात. बेलाच्या पानाचे पाणी प्यायल्यास तरतरी येते. मेंदूज्वर, तापातील वाताने रोगी बडबडत असेल तर हे पाणी पिण्यास देतात. त्वचारोगा-वरही बेल उपयोगी आहे. पोटात जंत झाल्यास बेलाच्या पानांचा रस घेतात. उलटी थांबण्यासाठी आंब्याच्या कोयीसह बेलफळाचा काढा देतात. शौचावाटे रक्त पडत असेल तर याचे चाटण उपयोगी आहे. उष्णतेमुळे तोंड आल्यास बेलफळ फोडून पाण्यात कढवावे व त्या पाण्याने गुळण्या कराव्यात. अंगात शक्ती येण्यासाठी बेलफळाचा अर्क काढून तो खावा आणि त्यावर गायीचे दूध प्यावे. बेल रक्तशुद्धी करणारा आहे. बेलफळाचे सरबत रुचकर लागते. ते भूक वाढवणारे आहे. बेलाच्या खोडातून उत्तम प्रतीचा डिंक मिळतो.

बेलाचे धार्मिक महत्व

इशश्र ढीशशबेलाच्या अंगी असणार्या महत्त्वाच्या गुणधर्मामुळेच आपल्या पूर्वजांनी त्याला पूजेच्या पत्रीत स्थान दिले आहे. शिवाय या वृक्षात अनेक देवदेवतांचे वास्तव्य असते अशीही धारणा आहे. म्हणूनच त्याचे संवर्धन, जतन केले पाहिजे. पानांचा रंग हिरवागार असून, हा रंग शंकराच्या साधेपणाचा व पवित्र्याचा द्योतक मानतात. बिल्वपत्रास शंकराचा त्रिशूल तर बेलाला साक्षात लक्ष्मी मानले आहे. स्कंद पुराणातही याचे महत्त्व वर्णिलेले आहे. त्रिदळातील डावे पान म्हणजे ब्रह्मदेव, उजवे विष्णू आणि मधले पान शिव-पार्वती आहेत. पाठीमागच्या बाजूला यक्ष असून, देठाच्या ठिकाणी इंद्र आणि इतर देव राहतात. काहींच्या मते त्रिदळ हे तीन वेदांचं प्रतीक आहे. बेलफळ हे श्रीफळ असून, ते लक्ष्मीला प्रिय आहे. माघ वद्य चतुर्दशी म्हणजेच महाशिवरात्रीला बेलवृक्षाचं महत्त्व आहे. तेव्हा शंकराला बेल वाहण्याचा प्रघात आहे. श्रावणात अनेक सुवासिनी शंकराला लक्ष बेल वाटण्याचे व्रत करतात. बेल वृक्षाच्या मुळात गिरिजादेवी, शरीरात (खोडात) दाक्षायणी, फांद्यांमध्ये महेश्वरी, पानांत पार्वती आणि फळात कात्यायनी अशी देवीची रुपे वसतात. बेलाचे त्रिदळ हे त्रिकाल, त्रिशक्ती, ओंकाराच्या तीन मात्रा यांचे द्योतक आहेत.

संदर्भ : डॉ.कांचनगंगा गंधे यांचे लिखाण व मराठी विश्वकोश

संकलन : भाग्यश्री जोगळेकर-कुलकर्णी




# देवाचा तराजू

देवा तुझ्या तराजूला एक पारडे जड का?
माणसाच्या ठोकळयाला दोन हाती माप का?
दुर्जनांच्या परिपत्या जन्मतो तो तूच ना?
हिंदवीला आग-याची मग सांग ना कैद का?
शुभ्रतेच्या ज्योतीसंगे काजळी किनार का?
जीवनाच्या धुंद क्षणी आसवांची धार का?
बेरजेचा गोफ झुले एखाद्याच्याच भाळी
कुण्या येती नशीबी केवळ वेदनांची जाळी
निर्जीव हया बाहुल्याला विकारांची चेतना का?
दिव्यत्वाच्या झेपेसाठी अपूर्णतेचा शाप का?
निर्मितीचा आनंद का रे वैचित्र्यात शोधतोस?
संभ्रमाच्या तराजूत का रे मानवाला तोलतोस?
यतीन सामंत

## १ Doctor Tips — सल्ला डॉक्टरचा



**अत्यधिक कॉफीचे सेवन केल्यास**-उपचार-हा आजार दीर्घकाळापासून असल्यास वैद्यकीय सल्ला घेणे नितांत आवश्यक आहे. मूत्राशयाच्या व्यायामांपासून ते ऑपरेशनपर्यंतचे पर्याय उपलब्ध आहे.डॉक्टर रुग्णाला जीवनशैलीत सुधारण्याचा सल्ला देतात. धूम्रपान न करणे आणि जास्त कॉफी न पिण्याचा सल्ला दिला जा-तो.स्नायूंना बळकट करण्यासाठी व्यायाम शिकवले जा-तात. यांना पेल्विक फ्लोर स्नायूंचे प्रशिक्षण व्यायाम असे म्हणतात.मूत्राशयाचे प्रशिक्षण दिले जाते. ह्यात जास्त जोरात लघवी आल्यास काय करणे. तसेच प्रशिक्षण देऊन लघवी कशी थांबवून ठेवू शकतो शिकवणी दिली जाते.

## २ Joke — विनोद




**मोहन : काळ्या पेनने ङ्कतांबडेफलिहून दाखव.**
**अनिल : अशक्य आहे. मोहनने आपले काळे पेन काढून !'तांबडे' असा शब्द लिहिला.**

## ३ Message — संदेश




Santa: mera beta meri baat sunta hi nahi hai
Banta: kyu? itna gamandi hai kya?
Santa: nahi. woh be-hara hai.

## ४ Thought — सुविचार



माझ्या शब्दकोशातून ङ्कअशक्यफ या शब्दास मी काढून टाकलेले आहे.
- नेपोलियन

**संस्कृत सुभाषित**
अनिर्वेदेन दीर्घेण निश्चयेन ध्रुवेण च
देवदेवप्रसादाच्च क्षिप्रं फलम्वाप्यते ।।

(शांतीपर्व, अध्याय १५३, ोक ११७, महाभारत)
अर्थ - दीर्घोद्योगाने, दृढनिश्चयाने व ईश्वरी कृपेने सत्वर कार्यसिद्धी होते.

# मनोरंजक महाशब्दकोड्यांचा समाचार



### आडवे शब्द

१. आराम करण्याचे सणवार? (वाक्प्रचार)
१०. छोटे कुबड
१२. पुरुष
१३. निवासस्थान
१४. रमापती
१५. जेमतेम, मोठ्या मुष्किलीने
१७. एक पालेभाजी
१९. कामावर बहिष्कार
२०. आंब्याचे रोप
२२. भीती, वचक
२३. अकस्मात, पूर्वकल्पना नसताना
२४. शिऱ्यातील प्रमुख पदार्थ
२५. निपचिप
२७. नशीब, काम
२८. फजिती, टवाळी
३०. प्रयत्न
३१. रममाण, निमग्न
३२. काम टाळणारा
३४. रेशमी धोतर
३७. घाण पाणी
४०. विनंती
४२. गर्व, ताठा
४३. रोगप्रतिबंधक द्रव
४५. गारा
४६. वानवा, उणीव
४८. घराची सजावट
५०. विद्यार्थ्यांचे राहण्याची जागा
५२. वैताग, नाकी आणलेला दम!
५४. पंख
५६. खून, वध
५८. बोलविणे
५९. अपवित्र
६२. सहाय्य
६४. सूर्याचा मंत्र
६५. परिस्थितीला अचानक मिळालेले वळण
६६. छाटणे
६७. आश्चर्य
६८. कर भरण्याची योग्यता
७०. दुर्लक्ष, हेळसांड
७२. चिक्कू माणूस
७३. नवीन
७४. लोकांचे राज्य
७६. साईबाबांची उक्ती
७९. मोठे गाव
८०. अवलोकन
८१. नजरफेक

### उभे शब्द

१. सूर्य
२. उत्तराधिकार
३. प्रत्येक वर्ष
४. श्रीरामाचे एक नाव
५. पराभव
६. पचनास सहाय्य करणार पदार्थ
७. गुन्हा
८. पूर्ण भरतीचे वेळ
९. उद्धट, अरेरावी करणारा मनुष्य
११. गुरांचा जमाव
१६. निरर्थक बडबड
१७. गडीमाणसे
१८. वरपांगी
१९. संभाव्य धोका
२१. हिंदीतील आढेवेढे
२२. दोरा
२४. कांती, तेज
२६. ऱ्हास
२९. जीभ
३०. पंतप्रधान
३३. कावळ्याचे ओरडणे
३५. करुणा, कीव
३६. भांडण
३८. वर्तमानपत्रातील कप्पा
३९. सभेची जागा
४१. रानभूल
४४. जळाऊ लाकूड
४६. पुष्कळ
४७. वाहून नेणे
४८. कायदा-सुव्यवस्थेला जबाबदार मंत्री
४९. खंदक
५१. मनाला टोचणारे दु:ख
५३. श्रेष्ठ-कनिष्ठ असा भेदाभेद
५५. अलमारी
५७. मीठ (हिंदी)
५८. जमाखर्च
५९. गटार
६०. भरपूर मार देणे, चोपणे (वाक्प्रचार)
६१. 'गपापा' होणारा ऐवज!
६३. तुकडी, पाकळी
६५. कोलकाताचे जुने नाव
६७. डोळे,६९. संकटातून पार करणारा
७०. निराश
७१. मोठा आवाज
७३. अपऱ्या नाकाचा
७५. पडसे,७६. च्या बरोबर
७७. प्रेम की पैसा?
७८. पहिला आकडा

### आडवे उत्तर

१.दिवाळी दसरा हातपाय पसरा १०.पोक १२.नर १३.घर १४.रमावर १५.कसाबसा १७.चाकवत १९.संप २०.कलम २२.धाक २३.अचानक २४.रवा २५.गपगार २७.कर्म ३०.प्रयास ३१.रत ३२.चुकार ३४.कद ३७.नरकवणी ४०.याचना ४२.नक्षा ४३.लस ४५.कारका ४६.अभाव ४८.गृहरचना ५०.वसतिगृह ५२.वात ५४.पर ५६.हनन ५८.आमंत्रण ५९.नापाक ६२.मदत ६४.गायत्री ६५.कलाटणी ६६.कलम ६७.नवल ६८.करपात्रता ७०.हयगय ७२.कद्रू ७३.नव ७४.जनसत्ता ७६.सबका मालिक एक ७९.शहर ८०.पाहणे ८१.कटाक्ष

### उभे उत्तर

१.दिनकर २.वारसा ३.दरसाल ४.राघव ५.हार ६.पाचक ७.परत ८.समा ९.रावणाचा लेक ११.कळप १६.बकवास १७.चाकरचुकर १८.वरकरणी १९.संकट २१.मगर २२.धागा २४.रया २६.पतन २९.रसना ३०.प्रधानमंत्री ३३.कावकाव ३५.दया ३६.कलह ३८.रकाना ३९.सभागृह ४१.चकवा ४४.सरपण ४६.अति ४७.वहन ४८.गृहमंत्री ४९.चर ५१.सल ५३.तरतमभाव ५५.कपाट ५७.नमक ५८.आयव्यय ५९.नाला ६०.कणीक तिंबणे ६१.हपापाचा माल ६३.दल ६५.कलकत्ता ६७.नयन ६९.तारक ७०.हताश ७१.गजर ७३.नकटा ७५.सर्दी ७६.सह ७७.माया ७८.एक



# क्रीडा विश्व

## थोडक्यात/ संक्षिप्त

### टी-२० विश्वचषकासाठी कॉमेंट्री पॅनेल जाहीर; मिताली-अंजुमसह अनेक दिग्गजांचा समावेश

मुंबई–महिला टी२० विश्वचषक २०२६ सुरु व्हायला ४ दिवस शिल्लक राहिले आहेत, भारताचा पहिला सामना हा पाकिस्तानविरुद्ध १४ जून रोजी खेळवला जाणार आहे. भारतीय महिला विश्वचषकाचे प्रक्षेपण हे स्टार स्पोर्ट्स नेटवर्कवर पाहता येणार आहे. आज भारतीय महिला संघाचा विश्वचषकाआधी सराव सामना वेस्ट इंडिजविरुद्ध खेळवला जात आहे. आता आयसीसीच्या पॅनेलमध्ये त्याचबरोबर जिओस्टार स्टार स्पोर्ट्स आणि जिओहॉटस्टारच्या माध्यमातून ही स्पर्धा क्रिकेट चाहत्यांना पाहायला मिळणार आहे. टेलिव्हिजनवर आणि लाईव्ह स्ट्रिमिंग ही उद्घाटन सामन्यासाठी, उपांत्य फेरी आणि अंतिम सामन्यासाठी हिंदी, तमिळ, तेलगू आणि कन्नडमध्ये दाखवली जाणार आहे. ही स्पर्धा आता सुरु होण्याआधी स्टार स्पोर्ट्सने त्यांच्या सोशल मिडियावर सविस्तर माहिती शेअर केली आहे.
महिला टी२० विश्वचषकाच्या हिंदी पॅनेलमध्ये दिग्गज कॉमेंटेटर आकाश चोप्रा, सबा करिम, किरण मोरे, कॉमेंटेटर जतीन सप्रू, कॉमेंटेटर आनंत त्यागी यांच्या नावाचा समावेश आहे तर महिला विश्वचषक २०२६ मध्ये सादरकर्त्यांच्या यादीमध्ये मयाती लांगर, भावना बालक्रिशनन, स्वेदा बहाल, तणय तिवारी, सुरेन सुदाराम, निधी दुगर यांच्या नावाचा समावेश आहे. हिंदी महिला कॉमेंट्री पॅनेलबद्दल सांगायचे झाले तर मिताली राज, जुलन गोस्वामी, अंजुम जोप्रा, रिमा मल्होत्रा, वेदा सुधामुर्ती आणि शिखा पांडे या दिग्गज महिला खेळाडू या विश्वचषकामध्ये कॉमेंट्री करताना दिसणार आहेत.
इंग्लिश कॉमेंट्री पॅनेल इंग्लिश कॉमेट्री पॅनेलमध्ये अनेक दिग्गज महिला आणि पुरुष माजी खेळाडूंना कॉमेंट्री पॅनेल पाहायला मिळणार आहे.

### इतिहासातला दुसरा सर्वात महागडा वर्ल्ड कप, यंदा असे काय असणार खास?

दिल्ली–गुरुवार ११ जून पासून फिफा वर्ल्ड कप २०२६ ला सुरुवात होतेय. फिफा हा फुटबॉलचा जगातील सर्वात मोठी स्पर्धा आहे. यंदा ही स्पर्धा अमेरिका, कॅनडा आणि मेक्सिको या देशांमध्ये होणार आहे. आजपासून ९६ वर्षांपूर्वी फिफामधील पहिला सर्वात महागडा वर्ल्ड कप पाहायला मिळाला होता. त्यानंतर यंदा होणारा फिफा वर्ल्ड कप २०२६ हा फिफाच्या इतिहासातील सर्वात महागडा वर्ल्ड कप ठरणार आहे. यंदा स्पर्धेत एकूण ४८ देशांचे संघ चॅम्पियन बनण्याच्या रेसमध्ये आहेत. हा फिफा वर्ल्ड कप ३८ दिवस चालणार असून यात एकूण १०४ सामने खेळवले जातील. यंदाचा वर्ल्ड कप हा फिफाच्या इतिहसातील सर्वात मोठा सीजन असणार आहे. सोबतच १ लाख २९ हजार कोटी रुपयांच्या खर्च या सीजनवर करण्यात आलेला आहे. तिथेच कतार २०२२ मध्ये १७ लाख कोटी रुपये खर्च करण्यात आले आहेत.फिफा वर्ल्ड कप विजेत्या संघाला किती मिळणार प्राईज मनी?
फिफा वर्ल्ड कप २०२६ ची प्राईज मनी एकूण ८७१ मिलियन डॉलर म्हणेजच जवळपास ८३००० कोटी रुपये आहे. ही प्राईजमनी कतार वर्ल्ड कपपेक्षा ४९ टक्के जास्त आहे. मागच्यावेळी एकूण प्राईज मनी ४१९० कोटी रुपयांची होती. यंदा फीफा वर्ल्ड कप २०२६ जिंकणाऱ्या संघाला ५० मिलियन डॉलर म्हणजेच ४७७ कोटी रुपये प्राईज मनी मिळेल.
६०० कोटींपर्यंत पोहोचणार प्रेक्षक संख्या : फिफाला यंदा आशा आहे की प्रेक्षक संख्या यंदा ६०० कोटींपर्यंत पोहोचेल.

### ३६ चेंडू ७२ धावा... २०० च्या स्ट्राईक रेटने सूर्या दादाने ठोकले अर्धशतक!

मुंबई–मुंबई टी२० लीग सुरु आहे आणि या लीगमध्ये भारतीय संघातील अनेक खेळाडू खेळत आहेत. यामध्ये सांगायचे झाले तर शिवम दुबे, श्रेयस अय्यर, भारताचा माजी कर्णधार सुर्यकुमार यादव, सरफराज खान या मोठ्या नावांचा समावेश आहे. बीसीसीआयने काही दिवसांपूर्वी भारतीय नव्या टी२० कर्णधाराची घोषणा केली, यामध्ये भारतीय टी२० संघाच्या कर्णधारपदावरुन त्याचबरोबर संघातून देखील सुर्यकुमार यादवला बाहेर करण्यात आले आहे. त्यानंतर त्याच्या चाहत्यांनी सोशल मिडियावर बीसीसीआयच्या या निर्णयांवर प्रश्न उपस्थित करण्यात आले होते. आता सुर्याला कर्णधार पदावरुन हटवल्यानंतर सुर्यकुमार आता त्याच्या जुन्या अंदाजात आला आहे.
मुंबई टी२० लीगचा ट्रायम्फ नाइट्स विरुद्ध मराठा रॉयल्स यांच्यामध्ये सामना पार पडला. या सामन्यात ट्रायम्फ नाइट्स संघाने सोमवारी मराठा रॉयल्सवर सहा गडी राखून दणदणीत विजय नोंदवला. या सामन्यात सुर्यकुमार यादवची जुनी शैली पाहायला मिळाली, त्याच्या स्फोटक फलंदाजीच्या जोरावर ट्रायम्फ नाइट्स संघाने विजय नावावर केला. मराठा रॉयल्सच्या संघाने पहिले फलंदाजी करत १५३ धावांचे लक्ष्य ट्रायम्फ नाइट्ससमोर उभे केले होते. सुर्यकुमार यादव याने आजच्या सामन्यात ३६ चेंडूमध्ये ७२ धावांची दमदार खेळी खेळली. त्याने आजच्या सामन्यामध्ये २०० च्या स्ट्राईक रेटने फलंदाजी केली.
आजच्या या सामन्यात सुर्यकुमार यादवने ७२ धावांच्या खेळीत, त्याने १३ चौकार आणि १

# भारताचा ऐतिहासिक विजय

## अफगाणिस्तानला ३०० धावांनी केले पराभूत!





दिल्ली–भारत विरुद्ध अफगाणिस्तान यांच्यामध्ये एकमेव कसोटी सामना आज संपला आहे, या सामन्यात पहिल्या दिनापासून भारतीय संघाचा दबदबा पाहायला मिळाला. भारताच्या संघाने शुभमन गिलच्या नेतृत्वाखाली अफगाणिस्तानविरुद्ध झालेल्या कसोटी सामन्यात विजय नोंदवला आहे. या सामन्यात भारताच्या फलंदाजांनी पहिल्या दिवशी दबदबा पाहायला मिळाला तर तर गोलंदाजांची देखील प्रभावशाली कामगिरी दिसली. भारत विरुद्ध अफगाणिस्तान या कसोटी सामन्यात तिसऱ्याच दिनी भारताच्या संघाने ३०० धावांनी विजय नोंदवला. या सामन्यातील कामगिरीवर टाका नजर.
सामन्याच्या सुरुवातीला भारताचा कर्णधार शुभमन गिल याने नाणेफेक जिंकून पहिले गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. टीम इंडियाने पहिले फलंदाजी करत पहिल्याच डावात ५६४ धावा केल्या. यामध्ये भारताचा कर्णधार शुभमन गिल याने महत्वाची खेळी खेळली, तर केएल राहुलने देखील शतक ठोकले. तर भारताच्या तीन फलंदाजांनी पहिल्याच डावामध्ये तीन अर्धशतके ठोकली. यामध्ये रिषभ पंत, साई सुदर्शन या दोघांनी प्रत्येकी ८१ धावांची खेळी खेळल्या तर वॉशिंग्टन सुंदर याने संघासाठी नाबाद ५२ धावा केल्या. या जोरावर भारताच्या संघाने पहिल्याच डावामध्ये धावांचा डोगंर उभा केला.
झालेल्या अफगाणिस्तानविरुद्ध कसोटी सामन्यात भारताच्या फिरकी गोलंदांजांनी महत्वाची भूमिका सांकारली. या सामन्यात दुसऱ्या डावामध्ये भारतीय संघासाठी पदार्पण करणारा मानव सुथार स्टार ठरला तर तिसऱ्या डावामध्ये वॉशिंग्टन सुंदर आणि कुलदीप यादव यांच्या फिरकीची जादू पाहायला मिळाली. दुसऱ्या डावामधील भारतीय संघाच्या गोलंदाजीबद्दल सांगायचे झाले तर मानव सुथार याने ६ विकेट्स त्याच्या पदार्पण सामन्यात घेतले. तर प्रसिद्ध कृष्णाने पहिल्या डावामध्ये संघाला तीन विकेट्स मिळवून दिले तर वॉशिंग्टन सुंदरला दुसऱ्या डावामध्ये देखील १ विकेट हाती लागली होती.
तिसऱ्या डावाबद्दल सांगायचे झाले तर वॉशिंग्टन सुंदरच्या फिरकीची जादू पाहायला मिळाली आहे. सुंदरने तिसऱ्या डावामध्ये ४ विकेट्स घेतले तर कुलदीप यादवने संघाला तीन विकेट्स मिळवून दिले. मानव सुथार आणि मोहम्मद सिराज यांनी संघाला प्रत्येकी १ विकेट्स मिळवून दिला.

## विश्वचषक सुरू होण्याच्या काही दिवसांपूर्वी

# गडकरींनी आंतरराष्ट्रीय सामने होण्याअगोदर महत्वपूर्ण घोषणा



**नागपूर:**'बार्सिलोना क्लब'कडून भारतात तीन सामने आयोजित करण्याचा प्रस्ताव असून आंतरराष्ट्रीय फुटबॉलपटूंनी नागपुरात खेळावे, यासाठी प्रयत्न सुरू असल्याचे गडकरींनी सांगितले. त्यासाठी यशवंत स्टेडियमचे आधुनिकीकरण करावे लागणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. नागपूर शहर देशाची क्रीडा राजधानी' व्हावी, अशी इच्छा व्यक्त करत गडकरींनी शहरात मोठ्या प्रमाणावर क्रीडा सुविधा उभारण्याची घोषणा केली. पुढील वर्षी विदर्भस्तरीय खासदार क्रीडा महोत्सव आयोजित करण्यात येणार असून त्यात एक लाखांहून अधिक खेळाडू सहभागी होतील, असे त्यांनी सांगितले.

बार्सिलोना क्लब काय आहे?

स्पेनमधील बार्सिलोना हा क्लब जगातील सर्वात लोकप्रिय आणि यशस्वी फुटबॉल संघांपैकी एक म ानला जातो. १८९९ मध्ये स्थापन झालेल्या या क्लबने आपल्या आकर्षक आणि आक्रमक खेळशैलीमुळे फ ुटबॉलविश्वात वेगळी ओळख निर्माण केली. 'मेस क्यू उन क्लब' (केवळ एक क्लब नव्हे) हे ब्रीदवाक्य असलेल्या बार्सिलोनाचा कॅटालोनियाच्या सांस्कृतिक ओळखीशीही घट्ट संबंध आहे. 'कॅम्प नोऊ' हे त्यांचे ऐतिहासिक मैदान जगातील सर्वात मोठ्या फुटबॉल स्टेडियमपैकी एक मानले जाते.जोहान क्रुइफ यांनी रुजविलेली 'टिकी-टका' शैली पुढे पेप गार्डिओला यांच्या काळात शिखरावर पोहोचली आणि त्यातूनच क्लबने अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय जेतेपदे पटकावली. लिओनेल मेस्सी, झावी, इनिएस्ता, रोनाल्डिन्हो यांसारख्या दिग्गज खेळाडूंनी क्लबला जागतिक लोकप्रियतेच्या सर्वोच्च टप्प्यावर नेले. सध्या युवा खेळाडूंवर भर देत बार्सिलोना पुन्हा एकदा युरोपियन फुटबॉलम ध्ये आपले वर्चस्व प्रस्थापित करण्यासाठी प्रयत्नशील आहे. गडकरी यांच्या घोषणेमुळे भारतीय फुटबॉल चाहत्यांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे.

# पहिल्या कसोटीत इंग्लंडचा न्यूझीलंडवर ११५ धावांनी विजय



लंडन : इंग्लंड विरुद्ध न्यूझीलंड यांच्यात लॉर्ड्सवर झालेल्या पहिल्या कसोटी सामन्याच्या चौथ्या दिवशी, इंग्लंडने न्यूझीलंडवर ११५ धावांनी विजय मिळवला. न्यूझीलंडने आपला दुसरा डाव चौथ्या दिवशी पाच बाद ५५ धावांपासून पुढे खेळण्यास सुरू केला. त्यांना विजयासाठी २५४ धावांची गरज होती.खेळाच्या पहिल्या दोन तासांतच न्यूझीलंडने उर्वरित पाच गडी गमावले आणि त्यांचा संघ १३८ धावांवर गारद झाला.
इंग्लंडचा वेगवान गोलंदाज, गस ॲटकिन्सनने ३० धावांत पाच बळी घेतले. गोलंदाजांना अनुकूल असलेल्या खेळपट्टीवर २४ फलंदाज त्रिफळाचीत किंवा पायचीत झाले. फिरकी गोलंदाजांना सामन्यात एकही चेंडू टाकला नाही. ग्लेन फिलिप्स नाबाद ४४ धावांसह न्यूझीलंडचा सर्वाधिक धावा करणारा फलंदाज ठरला. इंग्लंडने पहिल्या डावात १४० आणि दुसर्या डावात २२६ धावा केल्या. न्यूझीलंडचा पहिला डाव ११३ धावांवर सर्वबाद झाला.ॲशेस दौर्यावर ऑस्ट्रेलियाकडून १-४ ने पराभव पत्करावा लागल्यानंतर इंग्लंडसाठी न्यूझीलंडविरुद्धची मालिका महत्त्वाची आहे. कर्णधार बेन स्टोक्सच्या संघाकडून कसोटी पदार्पण करणारा सलामीवीर एमिलिओ गे, ५७ धावांसह दोन्ही संघांमध्ये सर्वाधिक धावा करणारा फलंदाज ठरला. २०२४ नंतर प्रथमच खेळलेल्या ऑली रॉबिन्सनने सामन्यात सात बळी घेतले.

# थेट कर्णधार बनवणे चुकीचे : अश्विन यांचे संतापजनक

नवी दिल्ली : जो संघातच नव्हता, त्याला थेट कर्णधार कसे बनवले जाते? मी कुठेतरी आधीच वाचले होते की, श्रेयस अय्यर कर्णधार बनेल. मला फक्त एवढेच विचारायचे आहे की, जो टी-२० विश्वविजेत्या संघातही नव्हता, त्याला थेट कर्णधारपद कसे काय दिले जाते? मला श्रेयसच्या क्षमतेवर शंका नाही. त्याला संघात घेतले नव्हते तेव्हा मी त्याच्या बाजूने बोललो होतो. पण आधी संघात नसलेल्या एखाद्याला थेट कर्णधार बनवणे चुकीचे आहे, असे सडेतोड मत रवीचंद्रन अश्विनने व्यक्त केले.

## संघातच नव्हता, त्याला थेट कर्णधार कसे

अश्विन म्हणाला, सूर्यकुमार यादव सध्या चांगल्या फॉर्ममध्ये नाही हे मला मान्य आहे. त्याने फलंदाजीत चांगली कामगिरी केलेली नाही. पण एखादा विद्यार्थी शाळेत उत्तीर्ण झाल्यावर पुढल्या वर्गात जातो आणि जो नापास होतो त्याला त्या वर्गातच पुन्हा संधी दिली जाते. सूर्याने त्याच्या नेतृत्वात टी-२० वर्ल्डकप जिंकला होता. त्याच्याकडे पासिंगपेक्षा जास्त मार्क्स आहेत. कमीतकमी सूर्यकुमारला संघात तरी स्थान द्यायला हवे होते. त्याला स्वत:ला सिद्ध करण्याची संधी द्यायला हवी होती.



**कर्णधार म्हणून सूर्याची आकडेवारी**

सूर्यकुमार यादवच्या कर्णधारपदाखाली टीम इंडियाने एकूण ५२ सामने खेळले, त्यापैकी ४२ सामने जिंकले. विशेष म्हणजे, भारताने त्याच्या कर्णधारपदाखाली एकूण नऊ द्विपक्षीय मालिका खेळल्या आणि त्या सर्व जिंकल्या. इतकेच नाही, तर त्याच्या कर्णधारपदाखाली भारताने एकही सामना न हरता आशिया करंडक जिंकला. त्याच्या कर्णधारपदाखाली भारताने टी-२० विश्वचषक विजे-

# आयपीएलनंतर टी२० लीगमध्ये अर्जुनचा कहर, पहिल्याच ओव्हरला राडा, किती विकेट काढल्या?

मुंबई–आयपीएलमध्ये लखनऊ सूपर जाएटसच्या शेवटच्या सामन्यात अर्जुन तेंडुलकरने जबरदस्त गोलंदाजी केली होती.त्याच्या या गोलंदाजीचे सर्व स्तरावरून कौतुक करण्यात आले होते. विशेष वडील सचिन तेंडुलकरने देखील त्याच्या या गोलंदाजीचे कौतुक केले होते. त्यानंतर आता तीच लय कायम ठेवत अर्जुन तेंडुलकरने जबरदस्त गोलंदाजी केली आहे. विशेष म्हणजे त्याने पहिल्याच ओव्हरला राडा केला होता. त्यामुळे अर्जुन तेंडुलकरच्या या गोलंदाजीचे प्रचंड कौतुक होत आहे.
खरं तर टी२० मुंबई लीगमध्ये एफआरसीएस अंधेरी आणि बांद्रा ब्लास्टर यांच्यात सामना सूरू आहे. या सामन्यात बांद्रा



ब्लास्टरने टॉस जिंकून बॅटींगचा निर्णय घेतला होता. त्यामुळे एफआरसीएस अंधेरीकडून अर्जुन तेंडुलकर मैदानात आला होता. यावेळी त्याने पहिल्याच ओव्हरला दोन विकेट काढले होते. अर्जून तेंडुलकरने चौथ्या बॉलला प्रतिक कुमारला ४ धावांवर बाद केले होते.त्यानंतर त्याच ओव्हरच्या सहाव्या बॉलला त्याने पराग खानापूरची विकेट काढली होती. अशाप्रकारे अर्जुन तेंडुलकरने पहिल्याच ओव्हरला दोन विकेट काढल्या होत्या. अर्जुनच्या या जबरदस्त गोलंदाजीमुळे बांद्रा ब्लास्टर्सचा डाव गडगडला होता. त्याच्यानंतर अर्जुन तेंडुलकरने १८ व्या ओव्हरला आणखीन एक विकेट काढली. त्याच्यानंतर इतर खेळाडूंनी भेदक गोलंदाजी करून व्किटस काढल्या होत्या.पण त्यांना बांद्राला ऑलआऊट करता आले नाही.अर्जुन तेंडुलकरने त्याच्या ३ ओव्हरच्या स्पेलमध्ये ११ धावा देऊन ३ विकेट काढल्या होत्या. तर बांद्रा ब्लास्टर्स ९ विकेट गमावून १४४ धावा केल्या होत्या. त्यामुळे अंधेरीसमोर आता १४५ धावांचे लक्ष्य असणार आहे.
दरम्यान आयपीएलमध्ये अर्जुन तेंडुलकरला लखनऊ सूपर जाएटसच्या शेवटच्या सामन्यात बॉलिंग करायची संधी मिळाली होती. या संधीच सोनं करत अर्जूनने ४ ओव्हरमध्ये ३६ धावा देऊन १ विकेट काढली होती.यावेळी अर्जुन तेंडुलकरच्या या बॉलिंगचे प्रचंड कौतुक करण्यात आले होते.

# वानखेडेला हिटमॅन एकटाच चालेला, पण स्टेडिअमच्या गर्दीत कुणाला भेटला?

मुंबई–टीम इंडियाचा माजी कर्णधार अनुभवी खेळाडू रोहित शर्मा सध्या आगामी अफगाणिस्तानविरूद्ध वनडे मालिकेची तयारी करतो आहे.या मालिकेला येत्या १३ जुन २०२६ पासून सूरूवात होणार आहे.या मालिकेआधी रोहित शर्मा टी२० मुंबई लीगमध्ये उपस्थिती दाखवतो आहे. काहीच दिवसांपूर्वी रोहित शर्मा वानखेडेच्या मैदानावर पोहोचला होता.यावेळी तो अचानक मागे वळला आणि त्याने त्या दोघांची भेट घेतली आणि त्याची चौकशी केली. या संदर्भात रोहित शर्माचा व्हिडिओ देखील व्हायरल होत आहे.खरं तर मुंबई टी२० लीगमध्ये शनिवारी सूर्यकुमार यादव आणि श्रेयस अय्यरची टीम आमने सामने आली होती.या सामन्यात रोहित शर्मा प्रमुख पाहूणा म्हणून पोहोचला होता. याचवेळी स्टेडिअममध्ये त्याची भेट एमसीएसचे अध्यक्ष अजिंक्य नाईक, सुर्यकुमार यादव आणि श्रेयस अय्यरसोबत झाली होती.या भेटीचे फोटो देखील व्हायरल झाले होते.दरम्यान या भेटीआधी रोहित शर्मा दोन व्यक्तींशी स्टेडिअम बाहेर भेटला होता.त्याचं झालं अस वानखेडेच्या स्टेडिअमवर गाडीने येताच तो उतरला आणि लगेच आत जाण्यासाठी निघाला. इतक्यात कदाचित त्याला कुणाचा तरी मागून आवाज आला. हा आवाज ऐकूण रोहित मागे वळला. रोहितने त्या दोघांना पाहताच तो लगेच त्यांच्याजवळ गेला.
रोहित शर्मा यावेळी ज्यांना भेटला ते रोहित शर्माचे लहानपणीचे

# टीम इंडियात मोठे पद मिळाले, पण अय्यरने स्वत:ला बदलण्यास दिला नकार

मुंबई -भारतीय क्रिकेटमध्ये सध्या मोठा बदल पाहायला मिळत आहे. टीम इंडियाचा टी-२० कर्णधार म्हणून सूर्यकुमार यादवची जागा आता श्रेयस अय्यर याने घेतली आहे. कर्णधारपदाची जबाबदारी मिळाल्यानंतर अय्यरच्या वक्तव्याने सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे. नेतृत्वाची धुरा हाती आली असली तरी आपल्या स्वभावात किंवा विचारसरणीत कोणताही बदल करणार नसल्याचे त्याने स्पष्ट केले आहे.
मफ्मला माझी व्यक्तिमत्त्व बदलण्याची अजिबात गरज वाटत नाहीफ्फ - श्रेयस अय्यर
नवीन कर्णधार म्हणून आपल्या नेतृत्वशैलीबद्दल बोलताना अय्यर म्हणाला की, मफ्मला माझी व्यक्तिमत्त्व बदलण्याची अजिबात गरज वाटत नाही. मी जसा आधी होतो तसाच राहणार आहे. कोणाची नक्कल करणे किंवा कोणाच्या सावलीत राहण्याचा प्रयत्न करणे मला मान्य नाही.फ्फ अय्यरच्या मते, यशस्वी नेतृत्वासाठी स्वत:ची ओळख जपणे सर्वात महत्त्वाचे असते. त्यामुळे तो आपल्या नैसर्गिक शैलीत संघाचे नेतृत्व करणार असून खेळाडूंशीही त्याच पद्धतीने संवाद साधणार आहे.

## भार खांद्यावर घेताना श्रेयस बोल बोल बोलला

मुंबईच्या क्रिकेट संस्कृतीने घडवला अय्यर
मुंबईसारख्या क्रिकेटच्या पंढरीत वाढलेल्या अय्यरने आपल्या यशामागील संघर्षाचाही उल्लेख केला. तो म्हणाला की, मफ्मुंबईत प्रत्येक गल्लीत देशासाठी खेळण्याचे स्वप्न पाहणारे अनेक क्रिकेटपटू असतात. अशा स्पर्धात्मक वातावरणात स्वत:ला सिद्ध करत मी इथपर्यंत पोहाचला आहे.फ्फ त्यामुळे दबावाच्या परिस्थितीत कसे खेळायचे, संघाला कसे एकत्र ठेवायचे आणि विजयासाठी



कशी झुंज द्यायची याचा अनुभव त्याला लहानपणापासूनच मिळाला आहे. त्याचे लक्ष नेहमीच संघाला विजय मिळवून देण्यावर आणि खेळाचा आनंद घेण्यावर केंद्रित राहिले आहे.टी-२० संघात दमदार पुनरागमन
अय्यरसाठी ही कर्णधारपदाची संधी विशेष मानली जात आहे. डिसेंबर २०२३ नंतर तो भारतीय टी-२० संघाच्या योजनांमधून जवळपास बाहेर पडला होता. मात्र, सातत्यपूर्ण कामगिरी आणि देशांतर्गत तसेच आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील प्रभावी प्रदर्शनाच्या जोरावर त्याने जोरदार पुनरागमन केले. विशेष म्हणजे, संघात पुनरागमन करताच त्याच्याकडे थेट कर्णधारपदाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. त्यामुळे निवड समितीचा त्याच्यावर असलेला विश्वास स्पष्ट दिसून येतो.
आयर्लंडविरुद्ध पहिली मोठी परीक्षा
नवीन कर्णधार म्हणून अय्यरची पहिली कसोटी आयर्लंडविरुद्धच्या दोन सामन्यांच्या टी-२० मालिकेत लागणार आहे. या मालिकेत त्याच्या नेतृत्वशैलीकडे आणि निर्णयक्षमतेकडे सर्वांचे लक्ष असेल. संघातील वरिष्ठ आणि युवा खेळाडूंमध्ये योग्य समन्वय साधत तो भारताला विजय मिळवून देतो का, हे पाहणे उत्सुकतेचे ठरणार आहे.
दरम्यान, माजी भारतीय कर्णधार आणि माजी बीसीसीआय अध्यक्ष सौरव गांगुली यांनीही निवड समितीच्या निर्णयाचे समर्थन केले आहे. गांगुली म्हणाले, मफ्श्रेयस अय्यरने उत्कृष्ट कामगिरी केली आहे आणि तो या संधीचा पात्र आहे. सूर्यकुमार यादवला हटवण्याचा निर्णय चुकीचा नाही. निवडकर्त्यांनी विचारपूर्वक हा निर्णय घेतला आहे.फ्फ

# राष्ट्रीय सर्जन सप्ताह २०२६ निमित्त रक्तदान शिबीरास लातूरकरांचा उत्स्फुर्त प्रतिसाद

## विक्रमी रक्तदान करणारे रक्तदाते यांचा अनसंग हिरोज ऑफ लातूर पुरस्काराने गौरव

**लातूर/प्रतिनिधी:** राष्ट्रीय सर्जन सप्ताह २०२६ निमित्त सर्जिकल सोसायटी ऑफ लातूरतर्फे गुगळे हॉस्पिटल, लातूर येथे भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन रविवार दि. ७ रोजी करण्यात आले. या शिबीरात लातूरकरांनी उत्स्फुर्त सहभाग घेत रक्तदान केले. या शिबीरात विक्रमी रक्तदान करणारे रक्तदाते यांचा अनसंग हिरोज ऑफ लातूर पुरस्कार देऊन सत्कार करण्यात आला. तसेच रक्तदान करणाऱ्यां रक्तदात्यांना हेल्मेट भेट देण्यात आले.

रक्तदान शिबीरास खासदार डॉ. शिवाजी काळगे, डॉ. आनंद कामत (अध्यक्ष, MASI), डॉ. राजेंद्र गणेरीवाल (EC ASI d ASI वृक्षारोपण अभियान अध्यक्ष), डॉ. दीपक गुगळे (EC MASI), डॉ. अभिजित रायते (उपाध्यक्ष), डॉ. निखिल काळे (सचिव), डॉ. गणेश स्वामी (सहसचिव) तसेच ज्येष्ठ सर्जन डॉ. डी. एन. चिंते, डॉ. हंसराज बाहेती, डॉ. दिनकर काळे, डॉ. पी. बी. कुलकर्णी, डॉ. विक्रम राजपूत व डॉ. अजय पुनपळे यांची प्रमुख उपस्थिती होती. रक्तदान शिबीर यशस्वी करण्यासाठी इंडियन मेडिकल असोसिएशन (IMA) लातूरचे अध्यक्ष डॉ. हर्षवर्धन राऊत, सचिव डॉ. विश्रांत भारती, खजिनदार डॉ. मन्सूर भोसले, थऊथ च्या अध्यक्षा डॉ. श्वेता काटकर, सचिव डॉ. आकांक्षा त्रिपाठी व डॉ. वेदांत अवस्थी यांनीही सहभाग नोंदवत सहकार्य केले.

या प्रसंगी रक्तदान क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या लातूरच्या दत्ता आपसिंगेकर (१५१ वेळा रक्तदान), अनिल डुंगरवाल (११३ वेळा रक्तदान) आणि पारस चापसी (१३८ वेळा रक्तदान) या रक्तदात्यांचा Unsung Heroes of Latur पुरस्कार देऊन खासदार डॉ. शिवाजी काळगे यांच्या हस्ते गौरव करण्यात आला. याचबरोबर रस्ता सुरक्षा जनजागृती अभियानांतर्गत डॉक्टरांचे सहाय्यक कर्मचारी (फेलो शॅडोज) व वैद्यकीय प्रतिनिधींना हेल्मेटचे वितरण करण्यात



आले. समाजसेवा, रक्तदान व रस्ता सुरक्षा या त्रिसूत्रीचा संदेश देणारा हा उपक्रम उत्साहात पार पडला.

वृक्षारोपण कार्यक्रमात प्रमुख अतिथी डॉ. आनंद कामत (अध्यक्ष, MASI) व डॉ. राजेंद्र गणेरीवाल (EC ASI , वृक्षारोपण अभियान अध्यक्ष) होते. डॉ. दीपक गुगळे (EC MASI), डॉ योगानंद दडगे ( अध्यक्ष) , डॉ. निखिल काळे (सचिव) ,डॉ. अभिजित रायते (उपाध्यक्ष),डॉ. गणेश स्वामी (सहसचिव) , डॉ अविनाश बदने ( कोषाध्यक्ष) तसेच ज्येष्ठ सर्जन डॉ. डी. एन. चिंते, डॉ. हंसराज बाहेती, डॉ. अजय पुनपळे, डॉ मेघराज चावडा, डॉ बंकट फड, डॉ हळणीकर चंद्रशेखर, डॉ नितीन सरजे व उपस्थित होते.

# वादळी पाऊस व वाऱ्यामुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे करून तात्काळ मदत द्या; डॉ. प्रतापसिंह पाटील

**धाराशिव/प्रतिनिधी:** जिल्ह्यात वादळी वाऱ्यासह झालेल्या पावसामुळे अनेक गावांमध्ये मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून नुकसानग्रस्त शेतकरी व नागरिकांना तात्काळ मदत जाहीर करावी, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) जिल्हाध्यक्ष डॉ. प्रतापसिंह पाटील यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, वादळी वाऱ्यासह झालेल्या पावसामुळे अनेक ठिकाणी झाडे उन्मळून पडली असून वीजपुरवठा खंडित झाला आहे. तसेच काही पुलांची पडझड झाली असून रस्त्यांवर झाडे कोसळल्याने वाहतुकीस अडथळे निर्माण झाले आहेत. यामुळे नागरिकांना मोठ्या गैरसोयींचा सामना करावा लागत आहे.

याशिवाय शेतकऱ्यांच्या फळबागा, शेतीपिके तसेच इतर मालमत्तेचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. आधीच विविध संकटांना तोंड देणारा शेतकरी वर्ग या नैसर्गिक आपत्तीमुळे आर्थिक अडचणीत सापडला असून त्यांना तातडीच्या मदतीची गरज आहे.

या पार्श्वभूमीवर संबंधित महसूल, कृषी व इतर विभागांना तात्काळ सर्वेक्षण करून नुकसानग्रस्त भागातील पंचनामे करण्याचे आदेश द्यावेत, पडलेली झाडे व इतर अडथळे दूर करून वाहतूक मार्ग सुरळीत करावेत तसेच नुकसानग्रस्त शेतकरी व फळबाग धारकांना शासनाच्या नियमांनुसार त्वरित आर्थिक मदत जाहीर करावी, अशी मागणी डॉ. प्रतापसिंह पाटील यांनी केली आहे.

# जनार्दन पाटील यांची बाभळगाव निवासस्थानी आमदार अमित देशमुख यांची घेतली भेट



लातूर (प्रतिनिधी): महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री, माजी केंद्रीय मंत्री आदरणीय विलासरावजी देशमुख साहेब यांच्या लोककल्याणकारी कार्याची माहिती आणि विचारांचा संपूर्ण देशभरात प्रसार करण्यासाठी दिल्ली येथील श्री. जनार्दन पाटील यांनी आग्रा ते बाभळगाव (ता. लातूर) अशी विशेष 'कार यात्रा' काढली.

शनिवारी ही यात्रा लातूरमध्ये पोहोचली. आज रविवारी सकाळी जनार्दन पाटील यांनी बाभळगाव येथील स्मृतीस्थळी येऊन आदरांजली अर्पण केली. त्यानंतर त्यांनी बाभळगाव निवासस्थानी माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांची भेट घेतली. यावेळी त्यांचा त्यांनी यथोचित सन्मान करून त्यांच्या कार्याला शुभेच्छा दिल्या. यावेळी बाभळगावचे माजी उपसरपंच गोविंद देशमुख उपस्थित होते.

# एसीईए आणि अल्ट्राटेक सिमेंट कंपनीचा स्त्युत्य उपक्रम



**लातूर/प्रतिनिधी:** ५ जून जागतिक पर्यावरण दिन निमित्ताने अल्ट्राटेक सिमेंट कंपनी व असोसिएशन ऑफ कन्सल्टिंग इंजिनियर्स आर्किटेक्ट आणि सिव्हिल ड्राफ्ट्समनच्या संयुक्त विद्यमाने अंबेजोगाई रोड परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. हरित लातूर सुंदर लातूर असा होता या कार्यक्रमासाठी कंपनीचे लातूरचे अल्ट्राटेक कंपनीचे अधिकारी श्रीनिवास कोक्कुल आणि त्यांची टीम तसेच असोसिएशनकडून डॉ. अभिजीत देशपांडे सरसंबेकर, असोसिएशनचे अध्यक्ष मनोज देशमुख, सचिव वसीम शेख, रणजीत साळुंखे, विनोद उदगीरकर, गुलाब शेख अन्सार शेख, आसिफ शेख, रिजवान गडीवाले, वामन पाटील यांच्यासह असोसिएशनचे इतर पदाधिकारी उपस्थित होते, यावेळी एसीईए आणि सिमेंट कंपनी पदाधिकारी यांच्या वतीने झाडे लावा झाडे जगवाचा असा संदेश देण्यात आला.

# पत्रकार शरद राठोड यांचा वाढदिवस थाटात साजरा

**रेणापूर/प्रतिनिधी:** महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे रेणापूर तालुकाध्यक्ष ी शरद राठोड यांचा वाढदिवस पत्रकार संघाच्या वतीने मोठ्या थाटात संपन्न झाला.

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई शाखा रेणापूर तालुक्याच्या वतीने रेणापूर तालुका अध्यक्ष शरद राठोड यांच्या ३७ व्या वाढदिवसाचे आयोजन रेणापुरात करण्यात आले होते.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई चे प्रदेश उपाध्यक्ष अशोक देडे होते तर प्रमुख पाहूणे म्हणून रेणापूरचे दंडाधिकारी तथा तहसीलदार प्रशांत थोरात,पोलीस निरिक्षक सुधाकर देडे, पत्रकार संघाचे मराठवाडा उपाध्यक्ष विष्णू आचार्य,

लातूर जिल्हा संघटक सुधाकर फूले,लातूर जिल्हा इलेक्टॉनिक मिडीयाचे हारून मोमीन अदि उपस्थितीत होते.यावेळी राठोड यांचा महाराष्ट्र प्रदेश,मराठवाडा,जिल्हा संघाच्या वतीने शाल पुष्पहार घालून सत्कार करण्यात आला तर रेणापूर तालुका पत्रकार संघाच्या वतीने शाल, फेटा, श्रीफळ,पुष्पगुच्छ व कपड्यांचा आहेर देऊन यथोचित सत्कार करण्यात आला.तर तहसील कार्यालय,पोलीस स्टेशन आणि उपस्थित मित्र परिवाराच्या वतीने सत्कार करण्यात आला. पत्रकार संघाचे अशोक देडे, तहसीलदार प्रशांत थोरात,पोलीस निरिक्षक सुधाकर देडे यांनी राठोड यांना मनोगतातून शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन विष्णू आचार्य यांनी तर आभार पत्रकार संघाचे तालुका सचिव अनिल फुलारी यांनी मानले. यावेळी रेणापूर पत्रकार संघाचे अनिल फुलारी, मधुकर गालफाडे,गोपाळ चिताडे,उदयकुमार पाठक,संतोष तुरुप,उमेश जोशी,वाल्मीक केंद्रे,सतिष जाधव,बाळय्या स्वामी,वसंतराव सुर्यवंशी अदि सह राठोड यांचा मित्र परिवार मोठ्या प्रमाणात उपस्थित होता.

# महावितरणचा २१ वा वर्धापन दिन मोठया उत्साहात साजरा

## अनावश्यक खर्च टाळत सुरक्षा रॅली व आरोग्य शिबीराचे आयोजन

**लातूर/प्रतिनिधी:** अनावश्यक खर्च टाळून अत्यंत साधेपणाने व मोठया उत्सहात महावितरणे २१ वा वर्धापन दिन साजरा करण्यात आला. महावितरणचे वीजग्राहक, कर्मचारी यांच्यामध्ये विद्युत अपघाता बाबत साक्षरता निर्माण व्हावी या उद्देशाने सुरक्षा रॅलीचे व आरोग्य शिबीराचे आयोजन करण्यात आले होते..

विद्युत भवनातील लघू प्रशिक्षण सभागृहात कार्यकारी अभियंता अनिरूध्द घाटगे, सहाय्यक महाव्यवस्थापक (मासं) चेतन वाघ, उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी महेंद्र चुनारकर, उपकार्यकारी अभियंता प्रमोद दुधाळे, सहाय्यक अभियंता सुदर्शन बोळेगावे, शिलरत्न सुर्यवंशी, राहूल गाडे, श्री सुळ, तसेच आरोग्य शिबीराचे आयोजक आयकॉन हॉस्पीटलचे डॉ.अजनीकर यांच्या प्रमूख उपस्थितीतपार पडलेला २१ वा वर्धापन दिन शनिवारी (दि.६ जून) उत्सहात साजरा करण्यात आला.

याप्रसंगी लातूर परिमंडळाचे मुख्य अभियंता अरविंद बुलबुले यांनी उपस्थित अधिकारी, कर्मचारी व जनमित्रांना सुरक्षा शपथ देत महिनाभर साजरा होणाऱ्या विद्युत सुरक्षा जागर कर्यक्रमाची सुरवात केली.

याप्रसंगी श्री बुलबुले यांनी महावितरण कंपनी




अस्तित्वात आल्यापासून गेल्या वर्षभरात ऊजा विभाग व महावितरण प्रशासनाने केलेल्या नियोजन व विविध उपाययोजनांमुळे महावितरणने देशपातळीवरील पटकावलेल्या विविध पुरस्कारांचा दाखला देत ग्राहकाभिमूख सेवेबद्दल अधिकारी व कर्मचारी यांच्या भरीव योगदानाबद्दल कौतूक केले. मा. मुख्यमंत्री व ऊर्जामंत्री श्री देवेंद्र फडणवीस ऊर्जा विभागाच्या अपर मुख्य सचीव श्रीमती आभा शुक्ला तसेच महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री लोकेश चंद्र यांच्या नेतृत्वात राज्याच्या ऊर्जा क्षेत्रात अमूलाग्र व पर्यावरणपुर्वक बदल घडवून आणत, महावितरण प्रधानमंत्री सुर्यघर मोफत वीज योजना, प्रधानमंत्री सौर कृषी वाहिनी २.० यासारख्या योजनांमध्ये देशभरात प्रशंसनीय व उल्लेखनीय कामगीरी करू शकले. हरित ऊर्जेला चालना देण्याच्या दृष्टीने सौरऊर्जे च्या योजनांमध्ये लातूर परिमंडळ दिलेले उदिष्ट आपणांसर्वांच्या सहकार्याने वेळेच्या आत नक्कीच संपादीत करेल असे विचार मुख्य अभियंता अरविंद बुलबुले यांनी व्यक्त केले.

याप्रसंगी सुरवातील वर्धापन दिनाचा केक कट करण्यात आला तसेच वीज सुरक्षे बाबत जनजागृती होण्याच्या दृष्टिने रॅली काढण्यात आली त्याचबरोबर आयकॉन हॉस्पीटल यांच्या सहकार्याने आरोग्य शिबीराचे आयोजन करून मधूमेह, रक्तदाब यासारख्या विविध चाचण्या करून मोफत औषधे वाटप करून वैद्यकीय सल्ला डॉ अजनीकर यांच्या नेतृत्वातील तज्ञ डॉक्टरांनी दिला.

वर्धापन दिनाच्या कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी महेंद्र चुनारकर यांनी केले तर सुत्रसंचालन उपव्यवस्थापक अजीत जैन यांनी केले. कार्यक्रम यशश्वीतेसाठी अमीत नाचणे, अश्विन गायकवाड यांच्यासह परिमंडळ, मंडळव लातूर विभागातील अधिकारी, कर्मचारी व जनमित्रांनी विशेष परिश्रम घेतले.

# माजी मंत्री, आमदार अमित देशमुख यांनी बाभळगाव निवासस्थानी विविध संस्था पदाधिकाऱ्यांसह नागरिकांच्या घेतल्या भेटी



**लातूर/प्रतिनिधी:** राज्याचे माजी व लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री वैद्यकीय शिक्षण सांस्कृतिक कार्यमंत्री तथा महाराष्ट्र विधिमंडळ काँग्रेस पक्षाचे मुख्य प्रतोद आमदार अमित विलासराव देशमुख यांनी आज रविवार सकाळी बाभळगाव निवासस्थानी लातूर शहरासह जिल्हाभरातून आलेल्या विविध संस्था पदाधिकारी, काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी नागरिक यांच्या भेटी घेऊन त्यांच्या अडीअडचणी समस्या समजून घेऊन त्यांच्या निमंत्रनाचा स्वीकार करून संबंधितांना पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी सूचना केल्या.

यावेळी माजी आमदार वैजनाथ शिंदे, लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष प्राध्यापक डॉक्टर शिवाजी जवळगेकर, उपमहापौर स्नेहल उटगे, सभापती सचिन बंडापले, माजी महापौर दीपक सूळ, लातूर रासप जिल्हाध्यक्ष दादा करपे, धाराशिव युवक काँग्रेसचे अध्यक्ष अशलेश मोरे, ट्वेंटीवन शुगरचे व्हाईस चेअरमन विजय देशमुख, विलास को ऑपरेटिव्ह बँकेचे चेअरमन किरण जाधव, व्हाईस चेअरमन समद पटेल, गटनेते विजयकुमार साबदे, हनमंत पवार, गोविंद बोराडे, रवींद्र काळे, इसरार पठाण, विकास कांबळे, सय्यद मोइनउल्ला, विकास कांबळे, व्यंकटेश पुरी, गोविंद देशमुख, अल्लाबक्ष शेख, एकनाथ पाटील, छाया मस्के, अमित जाधव, पद्माकर वाघमारे, जालिंदर बर्डे, कैलास कांबळे, अनिलकुमार माळी, रंगनाथ घोडके, काशिनाथ जोंधळे, शिवाजी रसाळ, चंद्रकांत पाटील, विनोद वाकडे, पंडित येलाले, गणि बासले, शिवाजी लाडगे, दिगंबर लोहार, गुंडेराव डेंगळे, श्रीराम राठोड, सुरज राठोड, आर्यन माने, महादेव रसाळ, प्राध्यापक सुधीर आणवले, सचिन कराड, शरद पाटील, बळीराम कराड, धनंजय भोसले, गोविंद घार, गोरोबा कापसे, ज्ञानेश्वर पाटील, वेंकट जाधव, सुरेश गायकवाड, रहेमान शेख, अमर पाटील, एडवोकेट मनोज थोरात, विकास वाघमारे, एडवोकेट अतिश चिकटे, पप्पू देशमुख, महेश देशमुख, अजिजकुरेशी, फारुख अली, जय ढगे, महेश देशमुख, गंगाराम कोळी, श्रद्धा साळुंखे, प्रदीप चव्हाण आदिसह काँग्रेस पक्षाचे विविध पदाधिकारी, कार्यकर्ते,नागरिक उपस्थित होते.

# जागतिक पर्यावरण दिना निमित्त महानगरपालिकेतर्फे सायकल रॅली संपन्न



लातूर/ प्रतिनिधी: जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून लातूर शहर महानगरपालिकेच्या वतीने आज शहरात एका भव्य 'सायकल रॅली' चे आयोजन करण्यात आले होते. वाढते प्रदूषण रोखणे आणि पर्यावरण संवर्धनाबाबत नागरिकांमध्ये जनजागृती करणे, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता. या आरोग्यदायी आणि पर्यावरणपूरक उपक्रमात 'लातूर सायक्लिस्ट ग्रुप'च्या सदस्यांनी आणि महानगरपालिकेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी मोठ्या संख्येने आणि उत्साहाने सहभाग नोंदवला.

रॅलीचा शुभारंभ लातूरचे महापौर जयश्रीताईसोनकांबळे आणि लातूर महानगरपालिका अतिरिक्त आयुक्त देविदास जाधव यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आला. मान्यवरांनी हिरवा झेंडा दाखवून रॅलीला सुरुवात केली व स्वतःही या उपक्रमात सहभाग नोंदवून उपस्थितांचा उत्साह वाढवला. महानगरपालिकेच्या मुख्य इमारतीपासून सुरू झालेली ही रॅली शहरातील प्रमुख मार्गांवरून मार्गस्थ झाली. रॅली लातूर शहर महानगरपालिका, महात्मा गांधी चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक, आर. जे. कॉम्प्लेक्स, औसा रोड येथून यू-टर्न घेउन पुन्हा छत्रपती शिवाजी महाराज चौक, ५ नंबर चौक येथून यू-टर्न घेउन समारोप लातूर शहर महानगरपालिका कार्यालयात करण्यात आला.

पर्यावरण वाचवण्याचा आणि आरोग्याप्रति सजग राहण्याचा संदेश देणाऱ्या या रॅलीने संपूर्ण शहराचे लक्ष वेधून घेतले. लातूरकरांनीही या सायकल रॅलीचे स्वागत करत महानगरपालिकेच्या या स्तुत्य उपक्रमाचे मोठे कौतुक केले.


प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.



शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडेऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

# बळीराजा पावसाच्या प्रतीक्षेत; येणेगूर परिसरात मशागती पूर्ण

**येणेगूर (प्रतिनिधरी )** –उमरगा तालुक्यातील येणेगूर आणि परिसरातील शेतशिवारात आगामी खरीप हंगामाची पूर्वतयारी अंतिम टप्प्यात आली असून, येथील शेतकरी आता केवळ पेरणीयोग्य आणि दमदार पावसाच्या प्रतीक्षेत चातकासारखे डोळे लावून बसले आहेत. परिसरातील नळवाडी, महालिंगरायवाडी, सुपतगाव, कोराळ, तुगाव आदी शिवारांमध्ये नांगरणी, कुळवणीसह मशागत कामे पूर्ण झाली आहेत. बाजारपेठेत बियाणे आणि खते खरेदीसाठी शेतकऱ्यांची मोठी लगबग पाहायला मिळत असली, तरी हवामान विभागाचा अंदाज लक्षात घेता कृषी विभागाने शेतकऱ्यांना पेरणीची घाई न करण्याचा, तसेच दुबार पेरणीचे संकट टाळण्याचा महत्त्वपूर्ण सल्ला दिला आहे.

हवामान विभागाच्या अंदाजानुसार, मान्सूनचा प्रवास सध्या संथ गतीने सुरू असून, १० जूननंतरच भागात अधिकृत आणि समाधानकारक पाऊस सक्रिय होण्याची शक्यता आहे. सध्या होणारा पाऊस हा केवळ स्थानिक वातावरणीय बदलांमुळे होणारा मान्सूनपूर्व (प्री–मान्सून) पाऊस आहे. या केवळ १–२ सरींवर विसंबून शेतकऱ्यांनी पेरणी केल्यास ऐन उगवणीच्या काळात ओल सुकून बियाणे वाया जाण्याचा आणि दुबार पेरणीचा मोठा आर्थिक फटका बसण्याचा धोका निर्माण होऊ शकतो असे जेष्ठ नागरिकांकडून अंदाज मांडला जात आहे.

पावसाने ओढ दिली असली तरी येणेगूर परिसरातील शेतकरी कृषी सेवा केंद्रांवर बियाण्यांची तसेच खतांची खरेदी करण्यासाठी गर्दी करत आहेत.

मान्सूनच्या सुरुवातीला घाईघाईने पेरणी केल्यामुळे पाऊस गायब झाल्यास शेतकऱ्यांवर दुबार पेरणीची कुऱ्हाड कोसळते. हा आर्थिक फटका टाळण्यासाठी जमिनीत किमान ३ ते ४ इंच खोलवर पुरेसा ओलावा तयार झाल्याशिवाय किंवा संबंधित भागात किमान १०० मिलिमीटर पावसाची नोंद झाल्याशिवाय पेरणी करू नये, असा तांत्रिक सल्ला कृषी तज्ज्ञांनी दिला आहे.

# एसटीच्या हलगर्जीपणाचा फटका; 'तीर्थस्थान' योजनेतील महिला भाविक ३ तास ताटकळल्या!



कळंब (प्रतिनिधी)–महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या एसटी संगे तीर्थस्थान योजनेचा गाजावाजा केला जात असला, तरी कळंब आगारातील नियोजनशून्यता आणि कर्मचाऱ्यांच्या कथित हलगर्जीपणामुळे रविवारी (७ जून) महिला भाविकांना तब्बल तीन तास बसस्थानकाच्या प्रवेशद्वारावर ताटकळत उभे राहावे लागल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे.

कळंब आगारातून नाशिक, शिखर शिंगणापूर, पुरुषोत्तमपुरी, शिर्डी, पंढरपूर आणि अष्टविनायक दर्शनासाठी विशेष बसेस सोडण्यात आल्या होत्या. मात्र, वेळेवर योग्य बसेस उपलब्ध न झाल्याने संपूर्ण व्यवस्थेचा बोजवारा उडाला. परिणामी अनेक बस दोन ते तीन तास उशिराने रवाना झाल्याची माहिती समोर येत आहे.

स्थानिक स्तरावर अशीही चर्चा रंगली आहे की, आगारात काही चालकांची मर्जी सांभाळून त्यांना चांगल्या व नव्या बसेस दिल्या जातात, तर इतर चालकांच्या वाट्याला जुन्या आणि बिघाडग्रस्त बसेस येतात. त्यामुळे चालक–वाहकांना तारेवरची कसरत करावी लागत असून प्रवाशांच्या सुरक्षिततेचाही प्रश्न निर्माण झाला आहे.

याचबरोबर कळंब आगारात कायमस्वरूपी वाहन परीक्षक नसल्याने कोणाच्या तरी मर्जीतील वाहन परीक्षकाची नियुक्ती करून चालकांची पिळवणूक केली जात असल्याची दबक्या आवाजात चर्चा चालक वर्गात सुरू आहे. त्यामुळे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तातडीने कायमस्वरूपी वाहन परीक्षकाची नियुक्ती करावी, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

विशेष म्हणजे शिखर शिंगणापूर दर्शनासाठी पहाटे पाच वाजल्यापासून महिला भाविक बसस्थानकात जमल्या होत्या. मात्र, त्यांच्यासाठी देण्यात आलेल्या जुन्या बसमध्ये बसण्यास महिलांनी नकार दिला. नव्या बसची मागणी करत महिला बसस्थानकाच्या गेटवरच ठिय्या देऊन उभ्या राहिल्या. अखेर प्रशासनाला नमते घ्यावे लागले आणि महिलांसाठी नवीन बसची व्यवस्था करण्यात आली. मात्र तोपर्यंत तीन तासांचा विलंब झाला होता.

भाविकांच्या मते, धार्मिक यात्रेसाठी आलेल्या महिलांना अशा प्रकारे ताटकळत ठेवणे ही एसटी प्रशासनासाठी लाजिरवाणी बाब आहे. प्रवाशांच्या सोयीसाठी सुरू केलेल्या योजनेतच नियोजनाचा अभाव दिसून येत असल्याने संतप्त प्रतिक्रिया उमटत आहेत.

आता या संपूर्ण प्रकाराची आगारप्रमुख दखल घेणार का? जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई होणार का? आणि भाविकांची झालेली गैरसोय भरून काढण्यासाठी कोणती उपाययोजना केली जाणार? याकडे कळंब तालुक्याचे लक्ष लागले आहे.

भाविकांना दर्शनाची ओढ, पण एसटी प्रशासनाच्या ढिसाळ कारभारामुळे तासन्तास प्रतीक्षा अशी संतप्त भावना महिला भाविकांमधून व्यक्त होत आहे.

# तुरोरी येथील जलजीवन मिशनच्या चौकशी समितीची पाहणीविना माघार?

**उमरगा (प्रतिनिधरी )** – तालुक्यातील तुरोरी येथील जलजीवन मिशन पाणीपुरवठा योजनेतील कथित निकृष्ट कामांच्या चौकशीसाठी आलेली महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची समिती कोणतीही प्रत्यक्ष पाहणी न करताच माघारी परतल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. चौकशीसाठी आलेल्या अधिकाऱ्यांकडे योजनेचे अंदाजपत्रक व आवश्यक तांत्रिक कागदपत्रे नसल्याचे समोर आल्याने या प्रकरणाच्या पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

केंद्र सरकारच्या महत्त्वाकांक्षी जलजीवन मिशन अंतर्गत तुरोरी गावासाठी डिसेंबर २०२२ मध्ये पाणीपुरवठा योजनेस मंजुरी मिळाली होती. १८ महिन्यांत पूर्ण होणे अपेक्षित असलेले काम मुदत संपल्यानंतरही पूर्ण झाले नाही. त्यानंतर दंड भरून मुदतवाढ घेण्यात आली. मात्र कामात निकृष्ट दर्जाचा वापर व अंदाजपत्रकानुसार काम न झाल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. तत्कालीन उपसरपंच तथा पंचायत समिती सदस्य तुकाराम जाधव, विकास जाधव, माधव जाधव, शाहूराज शिंदे यांच्यासह ग्रामस्थांनी मार्च २०२५ मध्ये महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या कार्यकारी अभियंत्यांकडे लेखी तक्रार दाखल केली होती. तक्रारीत योजनेतील विविध अनियमिततांचे आठ मुद्दे नमूद करून सखोल चौकशीची मागणी करण्यात आली होती.

या पार्श्वभूमीवर गुरुवारी उपकार्यकारी अभियंता डी. यू. नगरकर, उपअभियंता ए. ए. गुरव आणि शाखा अभियंता निशिकांत कालेकर हे ग्रामपंचायत कार्यालयात दाखल झाले. ग्रामस्थही मोठ्या संख्येने उपस्थित होते. मात्र योजनेशी संबंधित अंदाजपत्रक, तांत्रिक नोंदी व इतर आवश्यक अभिलेख उपलब्ध नसल्याचे सांगून अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष पाहणी न करता चौकशी पुढे ढकलली. त्यामुळे उपस्थित ग्रामस्थांनी नाराजी व्यक्त केली. ग्रामस्थांच्या मते, वारंवार तक्रारी करूनही प्रत्यक्ष चौकशी होत नसल्याने प्रकरण दडपण्याचा प्रयत्न तर होत नाही ना, असा संशय निर्माण झाला आहे. संबंधित कामांची स्वतंत्र तांत्रिक समितीकडून तपासणी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी आता जोर धरत आहे.

स्वतंत्र तांत्रिक तपासणीची मागणी : जलजीवन मिशन योजनेतील कामाच्या गुणवत्तेबाबत गंभीर शंका उपस्थित होत असल्याने संपूर्ण प्रकल्पाची स्वतंत्र तांत्रिक समितीकडून तपासणी करावी, अशी ग्रामस्थांची मागणी आहे. जलजीवन मिशनसारख्या महत्त्वाच्या योजनेत झालेल्या कथित क अनियमिततेची निष्पक्ष चौकशी होऊन जबाबदारांवर कारवाई व्हावी, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# माजी सैनिकांची शिस्त आणि समाजसेवेचा आदर्श जनतेसमोर यायला हवा–शहाजी चालुक्य



धाराशिव (प्रतिनिधी)– भारतीय माजी सैनिक संघटना, धाराशिव तालुका शाखेचे उद्घाटन उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. यावेळी संघटनेच्या तालुका कार्यकारिणी घोषीत करून जिल्हा उपाध्यक्ष तथा तालुकाध्यक्षपदी नितीन माने यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.

प्रारंभी महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज, महाराष्ट्राची कुलस्वामिनी श्री तुळजाभवानी तसेच फिल्ड मार्शल करिअप्पा यांच्या प्रतिमांचे पूजन व दीपप्रज्वलन करण्यात आले. देशासाठी सर्वोच्च बलिदान देणाऱ्या शहीद जवानांना दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. यावेळी जय जवान, जय किसानच्या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला.

कार्यक्रमाचे उद्घाटन व प्रमुख मार्गदर्शक शहाजी चालूक्य होते. यावेळी राजेंद्र भागवत, अशोक सुरवसे, तानाजी जाधव, अरविंद कोकाटे, आबाजी जाधव, प्रभाकर हाके, धनंजय काळे, सत्यनारायण पुरी यांच्यासह जिल्हाभरातील माजी सैनिक संघटनेचे पदाधिकारी व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

उपस्थितांना मार्गदर्शन करताना शहाजी चालुक्य म्हणाले, सेवानिवृत्तीनंतर समाजासाठी केलेले कार्य हे सैन्यातील कोणत्याही पदापेक्षा मोठे असते. माजी सैनिकांनी आपली शिस्त, राष्ट्रनिष्ठा आणि सेवाभाव समाजहितासाठी वापरला पाहिजे. सैनिकांची शिस्त जनतेसमोर आदर्श म्हणून उभी राहिल्यास नव्या पिढीला प्रेरणा मिळेल.

ते पुढे म्हणाले की, संघटनेच्या माध्यमातून महाराष्ट्रातील पहिला माजी सैनिकांसाठीचा दवाखाना धाराशिव येथे उभारण्यात आला आहे. माजी मंत्री डॉ. पद्मसिंह पाटील यांच्या सहकार्याने माजी सैनिक कार्यालयासाठी जागा उपलब्ध झाली. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये माजी सैनिकांना आरक्षण मिळावे यासाठी संघटनेच्या माध्यमातून सातत्याने पाठपुरावा सुरू आहे. गाव तिथे संघटनेची शाखा हा उपक्रम राबवून संघटना अधिक सक्षम करण्याचा प्रयत्न केला जात असल्याचेही त्यांनी सांगितले.

कारगिल विजय दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्याचे आवाहन करताना त्यांनी ध्वजनिधी संकलन मोहिमेचाही उल्लेख केला. सैनिकांच्या वेतनवाढीबाबत अपेक्षित निर्णय न झाल्याची खंत व्यक्त करत त्यांनी आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या सध्या सुरू असलेल्या धाडसी व पारदर्शक कारवाईचे कौतुक केले.

पतसंस्था, बचत गट आणि आर्थिक नियोजनाच्या माध्यमातून माजी सैनिक व त्यांच्या कुटुंबीयांना बळ देण्याचे कार्य संघटनेकडून करण्यात येत असून उच्च शिक्षणासाठी विविध स्तरांवर मदत उपलब्ध करून दिली जात असल्याची माहितीही यावेळी देण्यात आली.

कार्यक्रमात नवनियुक्त तालुकाध्यक्ष नितीन माने तसेच नूतन पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन राजेंद्र बेंडकाळे यांनी केले.


लातूर समाचार धाराशिव
बातम्या,लेख व जाहिराती साठी संपर्क
9422472502
9175325708
9284321472


## धाराशिव शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका २२३९७६
२) रक्तपेढी २२३९७६
३) जिल्हा रुग्णालय २२६९२७
४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९
५) अग्नीशामक विभाग २२२१०१
६) रेल्वेस्टेशन २४०९९९
७) एसपी कार्यालय २२७६२०
८) जिल्हाधिकारी का.२२४५०१
९) तहसिल का. २२७८८२
१०) जि.प. २२५४०७
११)नगरपरिषद २२५४०७
१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२–२२२७४४
१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२–२२२२२६
१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२–२२७८ ९ २
१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२–२२३४०८
१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२–२२३३८७
१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२–२२२०१४
१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२–२२२५५५
१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२–२२२२९४
२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२–२२२२३६
२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२–२२२२१६
२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२
बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२–२२०६११
२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२–२२६८४०
२४) २४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२–२५) २२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१–२२१५५२
२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२–२२३३८८
२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२–२२३३४३
२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२–२२२५७०
२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२–२२२१३२
२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२–२२४१८४
३०) शिक्षण अधिकारी (माध्यमिक) ०२४७२–२२४१८४

# कॅनमध्ये डिझेल देण्याची शेतकऱ्यांची मागणी

**उमरगा (प्रतिनिधरी )** – शेतकऱ्यांना पेट्रोल पंपावर कॅनमध्ये डिझेल देत नसल्यामुळे त्रिकोळी ता उमरगा येथील वैतागलेल्या ट्रॅक्टर धारक शेतकऱ्यांनी कॅनसहित गुरुवारी, (दि ०४) तहसील कार्यालय गाठले. यावेळी कॅनमध्ये डिझेल देण्याची मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली.

पेट्रोल पंपमालक सध्या डिझेलचा तुटवडा असल्याचे सांगून ट्रॅक्टरधारक शेतकऱ्यांना कॅनमध्ये डिझेल देत नसल्याच्या घटना घडत आहेत. ट्रॅक्टर पंपावर घेऊन या मगच डिझेल भरून देऊ म्हणत कॅनमध्ये डिझेल देत नाहीत. शेतापासून पेट्रोल पंपाचे अंतर लांब आहे. त्यातच कामावरील चालू ट्रॅक्टर पंपावर आणणे परवडणारे व शक्य नाही.

पंपधारक कॅनमध्ये डिझेल भरायला नकार देत आहेत. याला वैतागलेल्या त्रिकोळी येथील ट्रॅक्टर धारक शेतकऱ्यांनी डिझेलच्या मागणीसाठी हातात रिकामे कॅन घेऊन चक्क तहसील कार्यालय गाठत तहसीलदारांना निवेदन दिले.

**शेतकऱ्यांची मशागतीची कामे ठप्प, ट्रॅक्टरच्या लांबच लांब रांगा**

यावेळी कॅनमध्ये डिझेल देण्यास पंप चालकांनी टाळाटाळ केल्यास आंदोलनांचा इशारा दिला आहे. यावेळी सदानंद तुकशेट्टी, अकबर पटेल, ज्ञानेश्वर मुगळे, महेश कोडगीर, हरी सुरवसे, तात्याराव अंबुलगे, लक्ष्मण शिंदे आदींसह ट्रॅक्टर मालक शेतकरी उपस्थित होते.

# ऊसतोड कामगारांना ऊसतोड कामगारांचे प्रमाणपत्र देण्याचे ग्रामसेवकांना निर्देश द्यावे ; जिल्हाधिकारी यांना निवेदन




धाराशिव (प्रतिनिधी)– महाराष्ट्र राज्यातील ऊसतोड कामगारांना त्यांचे हक्क अधिकार मिळवून देण्यासाठी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत ऊसतोड महामंडळा निर्मित करण्यात आले आहे. त्यांच्या माध्यमातून शासनाच्या विविध कल्याणकारी योजना व विविध सुविधा मिळवून देण्यासाठी ऊसतोड कामगारांची सर्वे करून नोंदणी करणे व ओळखपत्र वितरित करण्यासाठी खाजगी कंपनीची नियुक्ती करण्यात आली आहे.

ऊसतोड कामगारांना सदस्य नोंदणी अभियानात सहभाग नोंदविण्यासाठी धाराशिव जिल्ह्यातील गाव पातळीवरील ग्रामपंचायत अधिकारी व ग्रामसेवक यांचे ऊसतोड कामगार यांना ऊसतोड कामगार असल्याबाबत प्रमाणपत्र अत्यंत आवश्यक आहे महामंडळा मार्फत नोंदणी प्रक्रिया सोपविण्यात आलेल्या में. स्मार्ट सर्विसेस प्रायव्हेट लिमिटेड पुणे या कंपनीस संगणकीय प्रणाली द्वारे ग्रामसेवक यांचे ऊसतोड कामगार असल्याचे प्रमाणपत्र नोंदणी करण्यासाठी अनिवार्य असल्यामुळे जिल्हाधिकारी यांनी धाराशिव जिल्ह्यातील सर्व ग्रामसेवकांना ऊसतोड कामगार यांना ऊसतोड कामगार प्रमाणपत्र देण्याचे निर्देश देण्यात यावे. या करिता तुळजाभवानी कामगार संघटना महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने निवेदन देण्यात आले. यावेळी तुळजाभवानी ऊसतोड कामगार संघटनेचे संस्थापक अध्यक्ष सुरेश पवार यांच्यासह किरण राठोड,महादेव राठोड,नामदेव राठोड आदी पदाधिकारी उपस्थित होते

# धाराशिव पोलिसांची अवैध मद्य विरोधी कारवाई

धाराशिव (प्रतिनिधी)– कळंब पोलीस ठाणे अंतर्गत मंगल वय ६० वर्षे, रा. मस्सा ता. कळंब जि. धाराशिव या दि.०७.०६.२०२६ रोजी आपल्या राहत्या घरासमोर अंदाजे १५,००० किंमतीची १५० लिटर गावठी दारु निर्मीतीचे गुळमिश्रीत रासायनिक द्रव अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. तर बालीकाबाई वय ४५ वर्षे, रा. मंगरुळ ता. कळंब जि. धाराशिव हे दि.०७.०६.२०२६ रोजी आपल्या राहत्या घरासमोर अंदाजे १४,४०० किंमतीची १८० लिटर गावठी दारु निर्मीतीचे गुळमिश्रीत रासायनिक द्रव अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द महाराष्ट्र मद्य मनाई कायदा कलम–६५(ई) अन्वये कळंब पो ठाणे येथे स्वतंत्र २ गुन्हे नोंदविले आहेत.

तसेचस्थानिक गुन्हे शाखे अंतर्गत बाळासाहेब वय ५३ वर्षे, रा. घारगाव तांडा ता. कळंब जि. धाराशिव या दि.०७.०६.२०२६ रोजी आपल्या राहत्या घरासमोर अंदाजे ८२,००० किंमतीची ४०० लिटर गावठी दारु व गावठी दारु निर्मीतीचे गुळमिश्रीत रासायनिक द्रव अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द महाराष्ट्र मद्य मनाई कायदा कलम–६५(ई) अन्वये शिराढोण पो ठाणे येथे गुन्हा नोंदविला आहे.

# ३,०६,७५० रूपयाची 'तडजोड शुल्क'वसुल

धाराशिव (प्रतिनिधी)–धाराशिव शहर वाहतुक शाखा व संबंधीत पोलीस ठाण्यांनी महत्त्वाच्या रस्त्यांवर दि.०७ जुन रोजी मोटार वाहन कायदा–नियम भंग प्रकरणी एकुण ३६८ कारवाया करुन ३,०६,७५० 'तडजोड शुल्क'वसुल केले आहे.


सांज दैनिक लातूर समाचार हे मुद्रक,प्रकाशक ,संपादक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर येथे छापून समर्थनगर धाराशिव येथे प्रकाशित केले आहे.

Evening Daily Latur Samachar is Published by Dayanand Shankar Jade from Samarth Nagar,Dharashiv on behalf of Dayanand Shankar Jade ,edited by Dayanand Shankar Jade and Printed by Dayanand Shankar Jade at Jade Offset Printers,Mitra Nagar,Latur. Editor : Dayanand Shankar Jade Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649